अनुक्रम २०७५८ वि. भू- प्रवास
क्रमांक ....३७०३.... नों: दि: ...........
१८·१२·६

# मुठा ते मेन

## ( आजच्या जर्मनीचे दर्शन )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. १५०३०

न. वि. गाडगीळ

REFBK-0015030
REFBK-0015030

व्हीनस बुकस्टॉल : पुणें २



पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. न वि गाडगीळ

प्रकाशक :
सौ. सुलोचना लिमये, एम. ए.
व्हीनस बुकस्टॉल
पुणे २

© डॉ. न. वि. गाडगीळ
प्रथम आवृत्ती
१५ ऑगस्ट १९६५

**मूल्य – रुपये चार**

मुद्रक :
चं. रो. नागपुरे
सरस्वती मुद्रणालय,
३७० मंगळवार पेठ,
पुणे ११

मला वाटते, माझ्याइतका प्रवास फार थोड्यांनी केला असेल. जुन्या भाषेत सांगावयाचे झाले तर, बारा ज्योर्तिलिंगापैकी हिमालयातील दोन सोडून दिली तर बाकी सर्व मी पाहिली आहेत. भारतातील ब्रह्मपुत्रेपासून दक्षिणेतील कावेरीपर्यंत साऱ्या लोकमातांना पाहिले आहे, त्यांचे आशीर्वाद घेतले आहेत. सप्तपुरींपैकी अयोध्या सोडून बाकीच्या पाहिल्या आहेत. आणि कधी ना कधी तरी माझा आत्माराम अयोध्यानगरीत प्रवेश करील याची खात्री आहे. पंजाबमधील तर रोहतांक पर्वतापासून ते दिल्लीच्या सरहद्दीपर्यंत क्षेत्रे, रणक्षेत्रे धर्मक्षेत्रे, कुरुक्षेत्र धरून सर्व पाहिली आहेत. स्वातंत्र्यापूर्वी लाहोर वगैरे शहरे पाहिली, कराची, हैदराबाद पाहिले. आ–सिंधुसिंधूपर्यंता भारतभू पाहिली असे म्हटले तरी चालेल. महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात, महत्त्वाचे गाव निवडणुकीच्या अगर स्वातंत्र्याच्या चळवळीच्या दृष्टीने पाहण्याचे राहिले नाहीं. ' ब्राह्मण हिंडतु भला ' हे जणू मी व्रतच स्वीकारले होते. तथापि, सर्वत्र भलेपणाने हिंडलो नव्हतो आणि सर्वत्र उदंड पाणी असतानासुद्धा संध्या न करताना हिंडत होतो. अजिंठ्याच्या घाटापासून गिरनारच्या पहाडापर्यंत सारा प्रदेश तुडविला होता. गुहा–गुंफा जेवढ्या प्रसिद्ध आहेत, तेवढ्या पाहिल्या आहेत. पुरीच्या जगन्नाथापासून द्वारकेच्या कृष्णमंदिरापर्यंत सारे अवलोकिले आहे. एकलिंगजीचे दर्शन घेतले आहे. नाथद्वारचा प्रसाद खाल्ला आहे. ' सबसे न्यारी मथुरा नगरी ' येथील मनपसंत पेढे खाल्ले आहेत व गोकुळ–वृंदावनच्या रस्त्यावर जगमोहनाला मोहविणाऱ्या गोपीऐवजी गाई व ' मख्खन 'ऐवजी धूळ पाहिली आहे व खाल्ली आहे. नेपाळच्या सीमेवरील विराटनगर पाहिले, एवढेच नव्हे तर सप्तकोशींच्या प्रवाहांना साक्षीदार म्हणून राहणाऱ्या वराह-क्षेत्रातील वराह-स्वरूप भगवंताला पाहिले आहे; आणि दक्षिण टोकाच्या कन्याकुमारी परिसरातील अपूर्व संध्या पाहिली आहे. तात्पर्य, विद्यमान् भारतातील महत्त्वाचे असे काहीही पाहण्याचे राहिलेले नाही आणि न गाणाऱ्याचा गळा जसा बसतो, अनाभ्यासी ब्राह्मणाची विद्या जशी मलिन होते अगर न हिंडणाऱ्या पुढाऱ्याचे राजकारण नासते तसेच थोडे लक्षात घेऊन सतत प्रवास जवळचा अगर दूरचा करीतच असतो. तथापि, परदेशात गेलो नाही. अनेक जण मी परदेशांत जावे आणि माझ्या ' ज्ञानाला व मुत्सद्देगिरीला व्यापक करावे ' असे सांगत. मी ऐकून घेत असे. वेदांचा अभ्यास, इतिहास व

मला वाटते, माझ्याइतका प्रवास फार थोड्यांनी केला असेल. जुन्या भाषेत सांगावयाचे झाले तर, बारा ज्योर्तिलिंगापैकी हिमालयातील दोन सोडून दिली तर बाकी सर्व मी पाहिली आहेत. भारतातील ब्रह्मपुत्रेपासून दक्षिणेतील कावेरीपर्यंत साऱ्या लोकमातांना पाहिले आहे, त्यांचे आशीर्वाद घेतले आहेत. सप्तपुरींपैकी अयोध्या सोडून बाकीच्या पाहिल्या आहेत. आणि कधी ना कधी तरी माझा आत्माराम अयोध्यानगरीत प्रवेश करील याची खात्री आहे. पंजाबमधील तर रोहतांक पर्वतापासून ते दिल्लीच्या सरहद्दीपर्यंत क्षेत्रे, रणक्षेत्रे धर्मक्षेत्रे, कुरुक्षेत्र धरून सर्व पाहिली आहेत. स्वातंत्र्यापूर्वी लाहोर वगैरे शहरे पाहिली, कराची, हैदराबाद पाहिले. आ–सिंधुसिंधूपर्यंता भारतभू पाहिली असे म्हटले तरी चालेल. महाराष्ट्रात, विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात, महत्त्वाचे गाव निवडणुकीच्या अगर स्वातंत्र्याच्या चळवळीच्या दृष्टीने पाहण्याचे राहिले नाहीं. ' ब्राह्मण हिंडतु भला ' हे जणू मी व्रतच स्वीकारले होते. तथापि, सर्वत्र भलेपणाने हिंडलो नव्हतो आणि सर्वत्र उदंड पाणी असतानासुद्धा संध्या न करताना हिंडत होतो. अजिंठ्याच्या घाटापासून गिरनारच्या पहाडापर्यंत सारा प्रदेश तुडविला होता. गुहा–गुंफा जेवढ्या प्रसिद्ध आहेत, तेवढ्या पाहिल्या आहेत. पुरीच्या जगन्नाथापासून द्वारकेच्या कृष्णमंदिरापर्यंत सारे अवलोकिले आहे. एकलिंगजीचे दर्शन घेतले आहे. नाथद्वारचा प्रसाद खाल्ला आहे. ' सबसे न्यारी मथुरा नगरी ' येथील मनपसंत पेढे खाल्ले आहेत व गोकुळ–वृंदावनच्या रस्त्यावर जगमोहनाला मोहविणाऱ्या गोपींऐवजी गाई व ' मख्खन 'ऐवजी धूळ पाहिली आहे व खाल्ली आहे. नेपाळच्या सीमेवरील विराटनगर पाहिले, एवढेच नव्हे तर सप्तकोशींच्या प्रवाहांना साक्षीदार म्हणून राहणाऱ्या वराह-क्षेत्रातील वराह-स्वरूप भगवंताला पाहिले आहे; आणि दक्षिण टोकाच्या कन्याकुमारी परिसरातील अपूर्व संध्या पाहिली आहे. तात्पर्य, विद्यमान् भारतातील महत्त्वाचे असे काहीही पाहण्याचे राहिलेले नाही आणि न गाणाऱ्याचा गळा जसा बसतो, अनाभ्यासी ब्राह्मणाची विद्या जशी मलिन होते अगर न हिंडणाऱ्या पुढाऱ्याचे राजकारण नासते तसेच थोडे लक्षात घेऊन सतत प्रवास जवळचा अगर दूरचा करीतच असतो. तथापि, परदेशात गेलो नाही. अनेक जण मी परदेशांत जावे आणि माझ्या ' ज्ञानाला व मुत्सद्देगिरीला व्यापक करावे ' असे सांगत. मी ऐकून घेत असे. वेदांचा अभ्यास, इतिहास व

पुराण यांच्या अभ्यासाशिवाय व्यर्थ असे मानतात आणि ते खरे आहे. तसेच राजकारण हे गल्ली-बोळात राहून पुरे होत नाही, ह्याचा अनुभव येत होता. आणि दिल्लीच्याही चौका–चौकामधून सचिवालयातील चर्चेतून व मसलतीतून ते पूर्ण झाले, असे वाटत नव्हते. दिल्लीच्या मंत्रिपदी असताना नाना देशींचे मुत्सद्दी राजदूत भेटत, सौदागर--साहित्यिक भेटत, व्यापारी व व्यवसायी भेटत आणि हावऱ्या माणसाप्रमाणे त्यांच्याकडून त्यांच्या त्यांच्या देशांतील रीतीरिवाजांची, समस्यांची, राजकारणाची माहिती करून घेत असे. तथापि मुलीचा फोटो पाहणे आणि तिला प्रत्यक्ष पाहणे यांत फरक असतो. हुशार फोटोग्राफर ज्याप्रमाणे न्यून पुरे करतो, चपटे नाक सरळ दाखवितो, तसेच हे थोडे होत होते; आणि म्हणून अनेक प्रसंगी प्रवासाची इच्छा मनाच्या दरवाज्यावर टिचक्या मारू लागली होती.

## मनाने चिंतिले होते, पण —

१९४७ च्या अखेर स्टर्लिंगच्या प्रश्नाचा उहापोह करून निकाल लावण्यासाठीं त्यावेळचे अर्थमंत्री शण्मुखम् चेट्टी व मी जावे, असे जवळ जवळ ठरले होते. आणि त्याप्रमाणे कपडेही केले होते. पण त्यावेळी विठ्ठलची आई अतिशय आजारी पडली आणि जाणे रहित झाले. ते कपडे न लागणाऱ्या शस्त्राप्रमाणे शमीच्या झाडाखाली ठेवण्याऐवजी कपाटातच पडून होते. त्यांना जेव्हा जेव्हा पाही तेव्हा तेव्हा परदेशगमनाचे विचार मनात उद्भवत आणि दरिद्र्याच्या मनोरथाप्रमाणे विलीन होत. १९४८ च्या जुलैमध्ये लाहोरला सतलजच्या पाण्यासंबंधीच्या प्रश्नाबाबत चर्चा करण्यासाठी गेलो, आणि तांत्रिकदृष्टया मी परदेशाला गेलो, असे म्हणणे प्राप्त झाले. त्यावेळी पासपोर्ट काढावा लागला. सर्व तांत्रिक आन्हिक करावे लागले. पण लाहोरला गेलो व संध्याकाळी परत आलो. तेथील ४-५ तासांत कोठल्याही प्रकारे आपण परदेशात आहोत, असे वाटले नाही. मला तर भाषेची अडचणसुद्धां वाटली नाहीं. अंतरिक्षातून जाताना दोन्ही देशांमधील सीमा लोकांच्या मनातच आहे असेच आढळून आले. झाड एकीकडे, फांद्या दुसरीकडे, पडणारी फुले एकीकडे, फळे एकीकडे, असेच दिसून येत होते. पारिजातकाचे झाड सत्यभामेच्या अंगणात लावून त्याची फुले रुक्मिणीच्या अंगणात पडावी ही

कृष्णाची युक्ती विकृत बुद्धीने येथे साक्षात्कार घडवीत होती. देशाचे तुकडे करून, एका भागाला परदेश करून, विदेश करून मी परदेशात जाऊन आलो, असेच झाले होते. पुढे १९५४ साली मार्च महिन्यात १४ दिवस राष्ट्रकुल परिषदेसाठी लाहोरला गेलो होतो. लाहोरात मशिदी पाहिल्या, परित्यक्त गुरुद्वारे पाहिली, उजाड व उध्वस्त हिंदु-मंदिरे पाहिली. पूर्वीचे बहुसंख्याक हिंदूंचे मोहल्ले व बंगले पाहिले. मालवरून हिंडलो. विद्यार्थ्यांच्या सभेपुढे भाषण केले आणि याही वेळी परदेशात आहोत, असे वाटले नाही. रुष्ट झालेल्या चुलत भावाच्या आवारात आहोत, असे थोडे वाटले. पुन्हा एकदा १९६२ च्या जानेवारीत पाक-पंजाब व भारत-पंजाब ह्यांच्यातील सीमा निश्चित झाल्यानंतर गेलो होतो. तेथील गव्हर्नरच्या घरी उतरलो होतो. लाहोरच्या पंजाब विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाच्या दिवाणखान्यात जमलेल्या प्रचंड पाक नागरिकांसमोर व अधिकाऱ्यांसमोर भाषण झाले, आणि त्यात म्हणालो की, ' लब्रोपे खामोशीकी मोहोर है लेकिन दिल तो याद करता है ' (ओठांवर मौनतेची मोहोर लावली आहे; तथापि मनात आठवण जागृत आहे). ह्यावेळी लौकिकदृष्ट्या, राजनैतिकदृष्ट्या, भौगोलिकदृष्ट्या पाक हे परराज्य झाल्याचे कार्य पूर्ण झाले होते. तथापि, त्या गव्हर्नमेंट हाऊसमध्ये जी जुनी राजकारणी व शासनी मंडळी भेटली ती पूर्वीच्याच मैत्रीभावाने. मनात रुष्ट असली तरी शब्दांत व अभिनयात तोच पंजाबी गोडवा होता, भाषेत तीच अजीजी होती. तात्पर्य, पाकमध्ये गेलो असता परदेशात गेलो असे वाटले नाही. आणि म्हणून परदेशगमनाबाबत मनाची खंत दूर करू शकलो नाही.

१९६४ च्या जुलै महिन्यात माझ्या जीवनाचा फकीर पुणे विद्यापीठाच्या मशिदीत आला. फकीर म्हणण्याचे कारण मी मांडलेल्या जीवनाच्या कुंडलीत हे मी चिंतिले नव्हते; आणि येथील मुक्काम हा शेवटचाच असे धरून चालत होतो व चालत आहे. विद्यापीठाच्या काही कार्यक्रमानिमित्त युरोपियन भाषा केंद्राच्या कार्यक्रमाला गेलो असताना मुंबईतील पश्चिम जर्मन सरकारच्या दूतालयातील एक अधिकारी भेटले. १९६४ च्या सप्टेंबरअखेरची ही गोष्ट आहे. आणि त्यांनी मला बाजूला नेऊन विचारले की, ' पश्चिम जर्मन सरकार तुम्हांला एक महिना पश्चिम जर्मनीच्या निरीक्षणाचे आमंत्रण देऊ इच्छिते. तुम्ही स्वीकाराल का ? ' सामान्यपणे सावधान वृत्ती असल्यामुळे मी असे म्हणालो की,

'मी त्याचा अवश्य विचार करीन.' व अट्टल मुत्सद्याप्रमाणे होय अगर नाही काही न म्हणता ती मुलाखत मी संपवली.

ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात औपचारिक पत्र आले, आणि सामान्यपणे नोव्हेंबर महिन्यामध्ये येणे श्रेयस्कर अशीही सूचना त्यात होती. उत्तरात मी लिहिले की, 'मी पंधरा दिवस येऊ शकेन.' कारण २२ नोव्हेंबरला उपराष्ट्रपती पुणे विद्यापीठाला भेट देणार होते आणि त्यासाठी परत यावयाचे होते. १५ ऑक्टोबरला भेटीचा कार्यक्रम व त्याचे वेळापत्रक मुंबईपासून ते मुंबईस परत येईपर्यंतचे मला मिळाले. असेसुद्धा समजले की, माझ्याबरोबर नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कार्यवाह ह्या पण येणार आहेत. नंतर तयारीच्या कार्याला लागलो. कारण ३० ऑक्टोबरला ११॥ वाजता विमानाने मुंबईहून निघावयाचे होते. दरम्यान मला जे पत्र आले, त्याचीच एक नकल हिंदुस्थान सरकारकडे गेली व त्यांनी मला लिहिले की, "तुम्ही आमंत्रण स्वीकारावे व त्याप्रमाणे ते स्वीकारल्याचे कळल्यावर पासपोर्टची व परराष्ट्रीय हुंडणावळीची व्यवस्था केली जाईल.' निघण्यापूर्वी १५ दिवस देवी व कॉलराप्रतिबंधक लस टोचून घ्यावी लागते, त्याप्रमाणे टोचून घेतले, थोडा त्रास झाला. चिरंजीवांना परदेशात राहण्याचा ४ वर्षांचा अनुभव होता, त्यांनी काय करावे व कसे वागावे ह्याबद्दल मला एक संहिताच सांगितली. खादी टोपी न घालता दुसरे काही शिरस्त्राण घालावे असे अप्रत्यक्षपणे सुचविले. मी त्याला सांगितले की, खादी टोपीच घालून जाणार. दररोज दाढी केली पाहिजे ह्या त्याच्या फर्मानाला विचार करण्यात येईल असे उत्तर दिले. बाजारात जाऊन त्याने बिनखादीचे ३-४ शर्ट आणले. १७ वर्षे कपाटात ठेवलेले कपडे, त्यांची मुक्तता व्हावी त्याप्रमाणे त्या विजारीची, त्या ओव्हरकोटाची मी मुक्तता केली. आणि रामायणातील परिटावर सूड म्हणून परिटाकडून त्यांची शुद्धी करून घेतली. मध्यंतरी एक दिवस मुंबईला जाऊन मजबरोबर प्रवासास येणाऱ्या श्रीमती भन्साळी यांना भेटलो. त्यानंतर लुफ्तानसा विमान कंपनीच्या कचेरीत गेलो. इतक्या लांब जावयाचे तर इंग्लंडमध्ये का न जावे, हा विचार आमच्या दोघांच्या मनात आला आणि परदेशी हुंडणावळीचा प्रश्न भाड्याबाबत नव्हता; कारण हॅम्बुर्ग ते लंडन आणि लंडन ते फ्रॅंकफुर्ट अशी तिकिटे आम्ही मुंबईतच काढावयाची असे ठरले. प्रश्न लंडनमध्ये जे ४-५ दिवस राहावे

लागेल, त्याच्या खर्चासाठी लागणाऱ्या पैशाचा होता. हिंदुस्थानचे राजदूत जीवराजभाई मेहता यांना पत्र लिहून इंग्लंडमध्ये काय काय पहावयाचे याची सूचना दिली होती. त्यांचे उत्तरही आले होते व त्या ४-५ दिवसांच्या मुक्कामात त्यांचाच पाहुणा म्हणून राहणार असे जवळ जवळ मनाशी ठरविले होते. त्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. भट्टाचार्य यांना भेटलो. ते म्हणाले की, २५ पौंड पुरे होतील. त्याप्रमाणे त्यांचे पत्रही पुण्यास आले आणि त्या पत्राप्रमाणे पुण्यातील बँकेकडून २५ पौंडांचे चेक अमेरिकन एक्सप्रेस कंपनीचे घेतले.

## अथ विमानमार्गेण—

मी जर्मनीला जाणार आहे, ही वार्ता अर्थात् पुण्यात सर्वत्र ज्ञात झाली होती व अनेकांनी काही समारंभ करण्याचे चालविले होते, पण मी कोणताही समारंभ स्वीकारला नाही. निघण्यापूर्वी ८ दिवस मी दिल्लीला जाऊन आलो. तेथील जर्मन राजदूताने जेवणास बोलावले होते. बऱ्याच गप्पाही झाल्या. थंडीच्या दृष्टीने कपडे घेणे चांगले, असेही त्याने सुचविले, व त्याची दखल घेतली. दिल्लीला जाण्याच्या धांदलीत, सामानाची बांधाबांध करण्याच्या लगबगीत सौभाग्यवती जिन्यावरून पडली व हाड मोडले. मग क्षणभर विचार आला की, पहिल्या पत्नीचे आजाराने आपल्याला परदेशगमनाचा बेतच रद्द करावा लागला. पुन्हा तोच इतिहास निर्माण होणार की काय? पण २४ तासांच्या आत शस्त्रक्रिया होऊन विशेष काही गंभीर नाही, असे डॉक्टरांनी सांगितले आणि प्रवासाचा बेत कायम झाला. विघ्नहर्ता गणपती व अन्य देवतांचे स्मरण करून प्रवास निर्विघ्नपणे पार पडावा अशी प्रार्थना करून ता. २९ ऑक्टोबरला मोटारने दुपारी ३ ला निघून संध्याकाळपर्यंत मुंबईस पोचलो. बरोबर मुली आल्या होत्या. नातवंडांनी तर आम्हांला काय आणणार म्हणून भंडावून सोडले. ता. ३० ला १०॥ वाजता सांताक्रूझ विमानतळावर मुली, मुलगा, सूनबाई, नातवंडांसह सपत्नीक आलो. श्री. लक्ष्मणराव बर्वे हे हरहुन्नरी व हुशार, त्यामुळे तेथील तांत्रिक १५-२० मिनिटांत संपले. हुंडणावळ देणाऱ्या कारकुनाजवळ ४० रु. देऊन ३ पौंड हुंडणावळ मागितली, कारण ती सर्वांनाच मिळते. त्या कारकुनाने विचारले की, तुम्हांला ३ पौंड १५ दिवसाला कसे

पुरतील? मी म्हणालो की मी जर्मनीमध्ये सरकारी पाहुणा आहे. आणि मग त्याने कुठलातरी नियम सांगून देण्याचे नाकारले. पुढे असे कळाले की, माझ्या बरोबरच्या मिसेस भन्साळींना त्यांनी ते दिले. याचा अर्थ असा की, व्यवहारचातुर्य त्यांच्यात अधिक होतें.

बरोबर ११॥ वाजता आम्ही विमानात दाखल झालो. विमानात जाण्यापूर्वी सौभाग्यवती जरा सचिंत झाल्या, त्याचप्रमाणे श्री. भन्साळी पण थोडे सचिंत झाले. मी त्यांना सांगितले, तुम्ही काही काळजी करू नका. कारण श्रीमती भन्साळी याही प्रथमच परदेशात जात होत्या. त्यांनी पण मावशींना (माझ्या पत्नीचे सार्वजनिक नाव) सांगितले की, तुम्ही काळजी करू नका. मी गाडगीळांची सर्व व्यवस्था पाहीन. मग मी म्हणालो की सातवी मुलगी आता मला मिळाली आहे आणि या नांदीने नाटक आनंदपर्यवसायी होणार, हे स्पष्ट झाले.

विमानात आम्ही चढलो आणि आत बसल्यानंतर २-४ मिनिटांत कराची दिशेने विमान निघाले. विमानातील प्रवास गेल्या २० वर्षांत अनेक वेळा केला होता. त्यात नावीन्य नव्हते. विमान मला कधी लागत नाही व मोटारही लागत नाही. वरती आकाश, खाली समुद्र; दूरवर अस्पष्ट दिसणारा भारताचा किनारा याप्रमाणे प्रवास चालू होता. कराचीला आम्ही १॥ ला पोचून तेथून रात्री ११ ला पुढे निघणार होतो. आणि हे १० तास काय करावयाचे याचा विचार चालू होता. विमान सुरू होताच १० १५ मिनिटांत एक कागद देण्यात आला. यात नाव, गाव, पत्ता, बरोबरच्या मूल्यवान वस्तू, त्याचप्रमाणे पैसे किती आहेत इत्यादि माहिती द्यावयाची होती, ती दिली. ती देताना असे आढळून आले की, रुप-रुपयाच्या ५-६ नोटा पाकिटाच्या कोठल्यातरी कप्प्यात उपेक्षित पडलेल्या होत्या. सेविकेने मद्य पाहिजे का म्हणून विचारले. कारण बहुतेक प्रवासी ते घेत होते. मी नको असे सांगितले; कारण त्याची आवश्यकता काव्यासाठी, अन्य साहित्यासाठी किंवा वाह्यातपणे बोलण्यासाठी अनेकांना वाटते, तशी मला कधीच वाटली नाही. किंबहुना वर्षातून १-२ वेळा शांभवी घेत असे. पण ती माझ्यावर काही प्रभाव करू शकली नाही. वर्तमानपत्रे वाचत होतो, पण डोळ्याने पाहिलेले मनात प्रवेश करू शकत नव्हते. मनामध्ये दुसरेच विचार चालले होते. त्या दोन तासांच्या प्रवासात किती तरी वेळा सेविकेने काय पाहिजे? म्हणून विचारले. आणि दर वेळेला अरसिकतेने

' काही नको ' असे सांगत होतो. ' अन्य ' प्रवासी रंगलेल्या मैफलीत असावेत असे दिसत होते.

## कराचीचे दर्शन

१॥ चे सुमारास आमचे विमान कराचीच्या विमानतळावर उतरले, आणि तेथे अर्धा तास आमच्या पासपोर्टची, सामानाची तपासणी झाली. कमलिनीबाईच्या ओळखीचे तेथील एक मुसल्मान गृहस्थ त्यांना भेटण्यासाठी आले होते. ते तेथील एका मोठ्या कंपनीतील हिशोब-तपासनीस असल्याने विमानगृहातील अधिकाऱ्यांशी त्यांचा परिचय होता. मग आम्ही तात्पुरते सामान तेवढे बरोबर घेऊन बाकीचे तेथेच ठेवले; आणि त्यांच्या गाडीतून त्यांच्या घरी गेलो. वास्तविक आम्ही विमानात जवळ जवळ जेवण्याइतके यज्ञकर्म केले होते. त्यांच्या बंगल्यात गेल्यावर जेवणे भाग पडले. आणि ' बेताने खात जा ' हा पत्नीचा फतवा पायी नव्हे तोंडाने तुडवला! नावावरून, त्यांच्या पत्नीच्या पोशाखावरून ते कच्छी हिंदू असावेत असे प्रथम वाटले. पण लवकरच कळून आले की, ते मुस्लिम सद्गृहस्थ आहेत. अतिशय बोलके व गोड. त्याचप्रमाणे त्यांची पत्नी सुशिक्षित, प्रसन्नवदना अशीच होती. त्या वेळी अध्यक्षीय निवडणुकीचे रणमैदान गाजत होते. हळू हळू त्या बाबतीत मी त्यांना विचारत होतो आणि हिशोबतपासनीसाने जसे व्यवहाराचे स्वरूप खातेवार सांगावे, त्याप्रमाणे ते तेथील शासनासंबंधी सांगत होते. ५ वर्षांपूर्वी असलेली दुर्भिक्षता व अव्यवस्था कमी झाली होती, असे आढळून आले. कारस्थाने करणारे, गोंधळ करणारे, सामान्य जनतेला भडकविणारे धंदेवाईक राजकारणी ६ वर्षांत हुकूमशाही राज्यव्यवस्थेने निर्जीव व निर्बल करून टाकले होते. सामान्य जनता सुखी आहे, असेच त्यांनी सुचविले. लोकशाही तत्त्वज्ञानाला, जीवन-दर्शनाला हुकूमशाहीने हद्दपार केले होते व जनता आता ' कागाळ्या 'ऐवजी ' कवाली ' ऐकत होती. मैदानातील समशेरी वक्तृत्वाऐवजी शायरी ऐकत होती.

भोजनानंतर मी पथिक भाग २ चा काही भाग तास-दीड तास लिहिला. त्या ठिकाणी कोणी टेलिफोनने त्रास दिला नाही अगर कोणी ज्वलंत प्रश्नाची चर्चा करण्यास आला नाही. जी शांतता स्वगृही व विद्यापीठात मिळाली नाही, ती शांतता परदेशात, परगृही लाभली.

आमचे पुढील विमान लुफ्तानसा कंपनीचे दिल्लीहून रात्री ११ ला यावयाचे होते, व तोपर्यंतचा वेळ काढावयाचा होता. आमच्या यजमानदांपत्याने मग आम्हांला कराची शहर दाखविण्याचा कार्यक्रम आखला. ४।। वाजता आम्ही चहा पिऊन जे निघालो ते ६ वाजपर्यंत कराचीतील मोठ्या मोठ्या रस्त्यांतून हिंडलो. कराचीला १९३१ साली काँग्रेसच्या अधिवेशनानिमित्त गेलो होतो. त्यावेळी हे रेखीव शहर होते. आज त्याला थोडे अस्ताव्यस्त स्वरूप प्राप्त झालेले दिसले. बंदरभाग पाहिला, कायदेआझम जीना ह्यांचा बांधला जाणारा प्रशस्त दर्गा पाहिला. आज १७ वर्षे झाली जीनांच्या मृत्यूला. तथापि बांधकाम चालूच आहे. आणि भव्य प्रमाणावर हे स्मारक होणार हे उघड दिसत होते. आमच्या यजमानांनी आम्हांला मग बोटक्लबमध्ये नेले. काही १-२ जुन्या ओळखीचे गृहस्थ भेटले. नंतर आम्ही जिमखान्यात गेलो. कराचीचे सारे प्रतिष्ठित लोक याचे सभासद आहेत, असे कळले. भारत एक असताना मध्यवर्ती कायदेमंडळात असलेले २–३ जण तेथे भेटले. बहुतेक मंडळी मद्यपान करीत होती. तसे म्हटले तर इस्लामी धर्माप्रमाणे मद्यपान निषिद्ध आहे, ते हराम आहे. तथापि, न पिण्याचे पुण्य ज्यांना मिळत नाही, अगर ज्याचेजवळ पैसे नाहीत, तेच करतात. कायद्याने व धर्माने बंदी आहे, असे सांगण्यात येते. पण प्रत्यक्षात त्या जिमखान्याच्या सभागृहात तसे काही दिसून आले नाही. आमच्या यजमानाने तेथील सामाजिक धर्म पाळला. मी आणि कमलिनी भन्साळी यांनी पाइनॲपल घेऊन ती संध्याकाळ साजरी केली. जुन्या मित्रांना सावधगिरीने राजकीय स्थितीबद्दल विचारीत होतो व परिस्थिती जाणण्याचा प्रयत्न करत होतो. शिकलेल्या लोकांच्या मनात कुठे तरी, काही तरी खटकते आहे, असे मला वाटले. अन्न, वस्त्र, निवारा व मदिरा यथा प्रमाणात यथाप्रसंगी मिळाली तरी जीवन परिपूर्ण झाले, असे त्यांना वाटत नव्हते. ज्याला बौद्धिक जीवन म्हणतात व जे चर्चेतून अभिव्यक्त होते, वादविवादातून जे रंगते, ते जीवन तेथे नव्हते. मैफली होत्या पण सदासर्वकाळ मैफली ह्या रंगल्या तरी सर्वांनाच त्या तोषवू शकत नाहीत. जिमखाना क्लबमधून आम्ही पुन्हा एकदा मोठमोठ्या बाजारातून हिंडलो. हिंदीत लिहिलेली एकही पाटी दुकानातून दिसली नाही. उर्दूतील थोड्या होत्या. इंग्रजीचा जमाना जोरात होता. जिमखान्यामधील मंडळी इंग्रजी भाषेतच बोलताना आढळली

आणि पोशाखाच्या दृष्टीने एका कराचीत दोन कराची आहेत, असे आढळून आले. एक युरोपियन पद्धतीचे पोशाख केलेले, मात्र डोक्यावर लियाकती टोपी, आणि दुसरी कराची म्हणजे सल्वार व कुडता, या पोशाखात असणारी. सर्वसामान्य मनुष्याचे जीवन पाकिस्तानच्या ताबुताने बदलले नाही. सधन व्यापाऱ्यांच्या हाती अयूब येईपर्यंत सारी सत्ता होती. व अयूब आल्यानंतर काही लष्करी अधिकारी व श्रीमान वर्ग ह्यांच्याच हाती ती आहे. अनेक सिनेमागृहे आढळली. बहुतेक चित्रे पाश्चात्य जीवनावरील लागलेली होती. झपाट्याने पाकजीवन आधुनिक होत आहे, असेच वाटत होते.

## बादशाही जेवण

८॥ च्या सुमारास आम्ही कराची येथील प्रसिद्ध इंटर-कॉंटिनेन्टल हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलो. कितीतरी मजल्यांची ती इमारत आहे. आणि तेथील एकंदर थाट पाहिला तर अरबी भाषेतील सुरस कथांमध्ये जे वाचले होते, त्याचा अनुभव येऊ लागला. १०–१५ वर्षांचे आतील गोरी गोमटी मुले. विचित्र वेषाने नटलेली स्वागतार्थ उभी होती. सर्वत्र विजेच्या दिव्यांनी लखलखाट केला होता. काळ्या शालूवर जरीच्या टिकल्या भरलेल्या असाव्यात, त्याप्रमाणे सारे दृश्य होते. जगभर प्रसिद्ध असलेले असे ते हॉटेल होते. सारी व्यवस्था परकीयांच्या देखरेखीखाली होती. त्या हॉटेलमध्ये मोठाली स्नानगृहे होती, जलविहाराचीही सोय होती. माझ्यासारख्या शनवार पेठेतील खेडेगावी वस्तीत राहणाऱ्या माणसाला कल्पनेलाही सुचणार नाहीत, अशी दृश्ये तेथे दिसत होती. लक्ष्मीचा तो विलासमहाल होता! रसराज शृंगाराला मनापासून हवेसे वाटणारे निलय तेथे होते. सेवक व सेविका सर्व तारुण्याच्या मर्यादेच्या आत होत्या. सल्वारीबरोबर तंग साड्या पण लक्ष वेधून घेत होत्या. तेथे वावरणारी माणसे साऱ्या जगातून आलेली दिसत होती आणि एखाद् दुसरा माझ्यासारखा गावठी इसम सोडला तर सारे अपटुडेट होते. स्त्रिया हिंदी, आरबी भाषेतील कथांत वाचलेल्या पऱ्यांप्रमाणे होत्या. तात्पर्य, सामान्य माणसाला त्या ठिकाणी प्रथम आल्याने संभ्रम उत्पन्न होणारे असे ते दृश्य होते. आमच्या यजमानाने व्यवस्थापकाशी काही गोष्टी केल्या. आणि एका इसमाने आम्हांला त्या वास्तूतील, त्या यक्षनगरीतील साऱ्या सुखसोयी, विलासस्थाने दाखवली आणि

सातव्या मजल्यावर एका सूटमध्ये (खोलीमध्ये) नेले. त्या तीन खोल्या मिळून एक निवास होता–शयनागार, स्नानगृह व बसण्याची खोली. भीत भीत त्या वाटाड्याला मी भाडे विचारले. त्याने २५२ रु. सांगितले! मी विचारले आठवड्याचे का महिन्याचे? त्याने सांगितले एका दिवसाचे. आणि मी मनामध्ये माझे पुण्याचे निवासस्थान आणि महाराष्ट्रातील किंवा भारतातील अनेक खेड्यांत पाहिलेली सामान्यगृहे व झोपड्या यांचा विचार करू लागलो. माझ्याबरोबर असलेल्या श्रीमती भन्साळी मुंबईतील वरच्या वर्गाच्या आहेत. त्यांनाही दररोज २५२ रु. भाडे ऐकून आश्चर्य वाटले! हे फक्त भाडे. चहा, जेवण वगैरे शिवाय. आणि तेथून मग आश्चर्यग्रस्त झालेला मी आणखी दोन मजले लिफ्टने गेलो व त्या भोजनगृहात आम्ही चौघे एका टेबलाभोवती बसलो.

लता व रबरी फुग्यांनी सारे भोजनगृह शृंगारले होते. जणू काही कुणाच्या लग्नमंडपाचीच ती आरास होती. दररोज तेथे असेच असते व दररोजच तेथे सोईस्करपणे दांपत्य भाव आणून अगर सांगून अनेक स्त्री–पुरुष येत असतात. शहरातील प्रमुख व प्रतिष्ठित लोकांचे ते भोजनगृह आहे. श्रेष्ठ आतिथ्य घ्यावयाचे अगर द्यावयाचे झाल्यास तीच जागा सर्वश्रेष्ठ अशी कराचीची परंपरा आहे. २० वर्षांपूर्वी कराचीला हे वैभव मिळाले नव्हते आणि आजही ते अर्धा टक्का श्रीमंत असलेल्या जनतेचे रंगेल वृत्तीचे निवासस्थान झाले आहे. आमच्या यजमानाने लांबलचक कागदावर काही पाहिले आणि भोजनाची आज्ञा दिली. ते भोजन येऊन आम्ही ते घेऊन कॉफीने त्याची सांगता करून ते सोडीपर्यंत फक्त १॥ तास गेला. ह्या दीड तासात त्याठिकाणी आलेल्या मंडळीत ७–८ जण ओळखीचे भेटले. दिल्लीच्या जुन्या स्मृती ताज्या झाल्या. राजकीय मतभेद व शत्रुत्वही ऐन मैत्रीच्या व मानव्याच्या संदर्भात क्षणासाठी का होईना लुप्त झाले. मोकळ्या मनाने देशाची परिस्थिती ते सांगत होते. निवडणुकीबद्दल भविष्ये वर्तवीत होते. त्यांपैकी एकाने सुचविले की, बेगम फातिमा यांना मी भेटावे. जीना व त्यांच्या भगिनी फातिमा यांची व माझी चांगली ओळख होती. जीनांची तर १९१८ पासून ते भारत सोडीपर्यंत होती. फातिमा यांची १९३४ साली मध्यवर्ती कायदेमंडळात गेल्यापासूनची होती. अनेक वेळा जीनांच्या घरी चहा प्यायला या काळात गेलो होतो. अनेक स्मृती मनामध्ये निर्माण झाल्या. फातिमा या निवडणुकीस उभ्या आहेत, हे माहीत होते. त्यांच्याविरुद्ध केला

जाणारा प्रचारही माहीत होता. आणि या परिस्थितीत भेटायला जाणे मला प्रशस्त वाटेना. मी त्या सूचना करणाराला म्हणालो की, 'पुन्हा केव्हा तरी भेटेन.' आता जेवणाचे बिल घेऊन तेथील सेवक यजमानाकडे आला. यजमानाने १०० रु. ची नोट त्या बशीवर ठेवली. एका मिनिटाने तो त्याच बशीत १०–१० च्या २ नोटा घेऊन आला. त्यातील एक यजमानाने घेतली व एक तशीच ठेवली आणि जेव्हा त्या सेवकाने अदबीने मान वळवून सलाम केला तेव्हा जेवणाचे प्रत्येकी २० रु. पडले आणि पात्रामागे २॥ रु. बक्षिसी द्यावी लागली असे समजलो. साऱ्या सुंदर जेवणापासून निर्माण झालेल्या सुख-भावनेवर उदासीनतेची छाया पडली! यजमानाने एवढा खर्च करावा हे मनाला प्रशस्त वाटले नाही. पण माझा काही इलाज नव्हता. थोड्या मिनिटांतच त्या यक्षनगरीतून निघून विमानतळावर आलो. पुन्हा सर्व तांत्रिक झाले. आमचे पासपोर्ट आम्हांला मिळाले. सामान पूर्वीच लुफ्तानसा कंपनीच्या विमानात ठेवण्यात आले होते. बरोबर रात्री ११ ला आम्ही कराची सोडली. सर्व कराची विजेच्या लखलखाटाने नटली होती.

सुमारे तीन तासांनी आमचे बिमान इराकी वाळवंटी प्रदेशातील विमान-तळावर उतरले. ह्या तीन तासांत सेविकेने अनेक वेळा कोणते पेय पाहिजे म्हणून विचारले. मी मनात खरे म्हणजे चिडलो होतो. तथापि, तिचे सुंदर मुख व मधुर वाणी ह्यापुढे माझा राग तृणरहित जमिनीवर अग्नि पडतो त्याप्रमाणे निःसत्त्व झाला होता, निर्जीव झाला होता. स्थानिक वेळ एक व माझे घड्याळ दुसरीच वेळ दाखवत होते आणि त्यामुळे मनाला ही जेवण्याची वेळ आहे का झोपण्याची वेळ आहे, ह्याचा संभ्रम पडत होता. बाहेर काळोख होता. आतमध्ये निळा प्रकाश इकडून तिकडून निळ्या झग्यातून वावरणाऱ्या त्या सेविकांमुळे अधिक निळा वाटत होता. उद्यांची सकाळ केव्हा दिसणार! कशी दिसणार ह्याचे शब्दचित्र रिकामटेकडे मन काढत होते. आणि त्याच स्थितीत गुंग असतानाच निद्रेच्या प्रांतात नकळत प्रवेश केला आणि आरबी भाषेतील कथांमधील जनानखान्यात प्रवेश व्हावा व त्या इसमाचा पत्ता लागू नये तसेच थोडेसे झाले. एकदम काहीतरी आवाज ऐकू आला व कळले की, धारान ह्या विमानतळावर विमान उतरले आहे. माझ्या घड्याळात २॥ वाजले होते. विमानतळाचे घड्याळात संध्याकाळचे ८॥ वाजले होते.

विमानातून उतरण्यापूर्वी नाव-गाव वगैरेची आमची चौकशी झाली आणि नंतर २ फर्लांगांवर असलेल्या विमानगृहात आम्ही गेलो. विमानतळाची बांधणी मेघडंबरी स्वरूपाची मध्यवर्ती एक व भोवताली अनेक लहान लहान मेघडंबऱ्या होत्या. जणू काही एखाद्या तरुणीने एकेका कानात पाच-पाच, सहा-सहा भोकरांचा संच घालावा, असे वाटत होते. त्या प्रशस्त हॉलमध्ये कॉफी घेतली. नानातऱ्हेचे जिन्नस तेथे विक्रीस ठेवले होते. पण विकणारा हा स्त्री यात्रेकरूंकडेच अधिक लक्ष देत होता; तेथील वस्तू स्त्रीसुलभ इच्छांना साथ देणाऱ्या होत्या. पुस्तके तेथे नव्हती. पेयांचे मला आकर्षण नव्हते. भोवताली सगळे लांब झगे घातलेले, डोक्यावर चादर व त्यावर चुंबळ अशा पोशाखात अरबस्थानातील उंटाप्रमाणे उंच व सडपातळ असा सेवक वर्ग दिसत होता. उंटात काहीच सरळ नसते. ह्या सेवकांत मला काहीच वाकडे आढळून आले नाही. ते इंग्रजीत बोलत.

## विचारा कुलगुरू !

आणि मातृभाषा मराठी व राष्ट्रभाषा हिंदी ह्याबरोबर जगाची ओळख करून घेण्याच्या दृष्टीने इंग्रजीची योजना किती उपयुक्त आहे, ह्याची खात्री तेथे पटली. मला इंग्रजी येत नसते तर ‘ मुका बिचारा कुणी हका ’ असा हा पुणे विद्यापीठाचा कुलगुरू इकडून तिकडे दामटला गेला असता. कमलिनी भन्साळींनी काही तरी जिन्नस घेतलाच. मला वाटते, स्त्रीने काही जिन्नस पाहिले व पर्समध्ये पैसे असले आणि तिने तो खरेदी केला नाही, असा प्रसंग कपिलाषष्ठीसारखाच असतो. २० मिनिटे त्या विमानतळावर घालवून पुन्हा आमच्या विमानात आलो. आणि जणू काही कित्येक दिवसांनी आपण आपल्या घरात येत आहोत, असे वाटून आनंद वाटला. व्यक्ती आणि वास्तू यांच्यातील हा आपुलकीचा भाव मोठा विचित्र असतो. तुरुंगातही हाच अनुभव. प्रत्येक वेळी सुटताना त्या खोलीबद्दल आपुलकी वाटे आणि किंचित् वाईट पण वाटे. हातावरील फोडसुद्धा नाहीसा व्हावा असे वाटत असते आणि नाहीसा झाला म्हणजे चुकल्या-चुकल्यासारखे वाटते. हे का होते हे कोण सांगू शकेल ? विमान पुन्हा सुरू झाले आणि आता विमानाने पश्चिम दिशेकडे वाटचाल सुरू केली. अर्थात् ही माझी कल्पना नकाशा पाहिल्याने उत्पन्न झाली होती.

आणखी ३ तासांनी कैरो विमानतळ आला असे सेविकेने सांगितले. माझ्य

घड्याळात ६ वाजले होते आणि बाहेरच्या घड्याळात रात्रीचा एक वाजला होता. कैरोत त्यावेळीं मध्यरात्र होती. माझ्या घड्याळात प्रभात झाली होती व मन हे अखंड जागृत होते. क्षणभर ते कालातीत झाले होते. काल, आज व उद्या या तिन्हींचा निर्णय लावण्यास असमर्थ झालेले माझे मन कालातीत झाले होते. मर्त्य मनुष्य असून अमर ईश्वराच्या लक्षणसंपत्तीवर दावा सांगत होतो. पुन्हा कैरो विमानतळावर २५ मिनिटे आम्ही थांबलो. त्या ठिकाणी पुन्हा पेयाची विचारणा झाली आणि प्रातर्विधी करण्याची वेळ झाल्या कारणाने मी ते कार्य उरकले. तेथील परिचारकाने ऐटीत सलाम केला. आणि मग आतल्या खिशातील पाकिटातून त्याच्या आतल्या कप्प्यात असलेल्या रुप-रुपयाच्या ४–५ रुपयांपैकी १ नोट बाहेर काढून गीतेत सांगितल्याप्रमाणे गुह्यातले गुह्य ज्ञान द्यावे त्याप्रमाणे ती एक भारतीय समृद्धीची संपत्तीची वैभवाची प्रतिनिधी अशी त्याला बहाल केली! त्याने ती घेतली. तसा तो पुणेरी व्यवहारचतुर दिसला. पण लागलीच म्हणाला की, आणखी एक द्या. ही पूर्वीच्या निम्मे झाली आहे. ह्याचाच अर्थ भारतीय रुपया ५० टक्के किंमतीत त्याच्या दृष्टीने उतरला आहे, ह्याचा साक्षात्कार मला झाला. त्याने वरील शब्द न उच्चारता दोन नव्हे तीन अधिक मागितल्या असत्या तरी दिल्या असत्या. कारण कर्णाची व हरिश्चंद्राची परंपरा असलेल्या भारतीय संस्कृतीचा मी प्रतिनिधी होतो. पण किंमत उतरली आहे हे सांगण्याने माझी राष्ट्रीय अस्मिता विच्छिन्न झाली. आमचे अर्थमंत्री रुपयाचा भाव १७ आणे करीत. बाजारात त्याचा भाव सोळा आणे पण पदार्थात त्या रुपयाचा नूर निम्मा उतरला होता. म्हातारा झाला तरी मनुष्याचे नाक, डोळे तसेच राहतात पण कमी काम देतात. कर्णद्वयही तसेच करतात. आणि हा भारताचा रुपया बाह्य स्वरूपात तसाच असूनसुद्धा देशात पदार्थामध्ये किंमतीने उतरला आहे हे मी जाणत होतो, पण त्याचा राग नव्हता. पत्नी घरात बोलली तरी पति फारसा रागावत नाही, मात्र तिऱ्हाइतादेखत ती बोलल्यास पारा एवढा चढतो की, विवेकाचा थर्मामीटर फुटतो. माझेही तसेच झाले. तथापि मी त्याच्याकडे अर्धवट हास्य अगर लास्यमिश्रित दृष्टीने पाहून तेथून निघालो. तथापि, पोटात शिरलेली माशी बाहेर पडेपर्यंत ओकारी निघत असते त्याप्रमाणे माझ्या मनातील राग उसळून येत होता.

ती चहाची वेळ होती म्हणून मधल्या हॉलमध्ये चहाची चौकशी केली, पण त्या वातावरणात चहा पिणे म्हणजे किंचित् कमी मानले जात आहे, असा समज झाला व मग कॉफीच घेतली. ती गरम असल्याकारणाने चहाच प्यायलो अशी समज करून घेतली. बहुतेकजण दूध व साखर न घेता ती पीत होते. मी पुण्यातील समन्वयवादी म्हणून साखर न घेता दूध घेऊन ती दोन कपांपेक्षा अधिक प्यायलो. या २५ मिनिटांपैकी बहुतेक वेळ मी तेथे टेबलावर ठेवलेले एक साप्ताहिक पाहण्यात घालवला. त्यात नुकतीच कैरोला झालेल्या अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेची हकीकत दिली होती. चित्रात ७ ताड उंचीचा नासर व त्याच्याशेजारी नावाने लालबहादूर पण उंचीने अंगुष्ठवत् असे आमच्या महामंत्र्यांचे चित्र पाहिले. आकृती विशेष नसताना त्यांच्याबद्दल मला आदर वाटत होता. आणि पदस्थतेमुळे अनेकांनाही वाटत होता असे वाटत होते.

इजिप्तमध्ये पिरॅमिड पाहावेत, स्फिंक ही कोडे दर्शविणारी आकृती पाहावी असेही विचार मनात आले होते. तसे म्हटले तर प्रेसिडेंट नासर हे पंजाबमध्ये आले होते व भाक्रा धरण मी त्यांना दाखविले होते. बराच वेळ मी त्यांच्या सहवासात होतो. त्यांनी मला ईजिप्तला येण्याचे निमंत्रणही दिले होते. गव्हर्नर असल्याने ते स्वीकारले नाही व नेहरूंना माझा तो निर्णय पसंत पडला. आता सत्तेची कवचकुंडले नव्हती म्हणून त्यांची भेट घेणे सुज्ञतेचे वाटले नाही. खुद्द कैरो काय आहे, कसे आहे हे 'उडत' सुद्धा पाहिले नाही. अर्ध्या तासाच्या मुक्कामानंतर विमानाने ख्रिस्ती धर्माचे आद्य-पीठ त्या रोममार्गे उड्डाण केले. आता झोप लागत नव्हती आणि मी घड्याळ बदलले नसल्याने घड्याळात सकाळचे ९ वाजले होते. सुमारे २ तासांनी रोममध्ये आलो. तेथील घड्याळात पहाटेचे पाच वाजले होते. सेविकेने सुंदर चहा आणला. रोमच्या विमानगृहात अर्धा-एक तास आग्ही काढला. त्या ठिकाणी अनेक पाद्री दिसले आणि अनेक नन्स म्हणजे देवदासी भेटल्या. तेथील बरेचसे लोक इंग्रजी बोलत होते, काही तेथील स्थानिक भाषा बोलत होते. त्यांतील काही काही समजत होते. आपले विमान नाईल व भूमध्य समुद्र ओलांडून रोमला आले आहे, हे जाणून आपण आता यूरोपमध्ये आलो आहोत, यामुळे मनावर थोडा परिणाम झाला.

## किंचित जगत्यात्री

आशिया खंडातील हिंदुस्थान, पाकिस्तान, अरबस्तान, जीझस्‌ची जन्मभूमी

इस्रायल ओलांडून आफ्रिका खंडात अर्धा तास मुक्काम करून हा किंचित् जगत्यात्री यूरोप खंडाच्या प्राचीन व प्रसिद्ध नगरीत उतरला होता. त्रिखंड पृथ्वी पाहिली, असे मला आता बोलण्याचा हक्क प्राप्त झाला. कीर्ती त्रिखंड गेली नाही. किंबहुना शनिवार पेठ तिने फारशी ओलांडलीच नाही. भारताच्या महानतेच्या महामंडळात सामान्य ताऱ्याप्रमाणे सुद्धा कीर्ती लुकलुकली नाही. तथापि, हिंदीमध्ये म्हण आहे की, 'आपआपके तानमें चिडियाँ भी मस्तान है!' (साध्या चिमणीला आपल्या चिवचिवण्यात तानसेनची तान आहे, असे वाटते). त्याप्रमाणे माझे मन अभिमानित झाले होते. आत्मगौरव त्यात स्फुरत होता. मार्कोपोलो अगर ह्यू-एन-त्संग ह्या जगप्रसिद्ध प्रवाशांच्या आजूबाजूला कुठेतरी आपला नंबर आता लागेल, असा मनाने कौल दिला. आपण प्रवास-वर्णन लिहू, पाहिलेले व ऐकलेले तर लिहूच लिहू पण न पाहिलेले सुद्धा लिहू, न ऐकलेले सांगू असेही थोडे वाटले. कारण एखाद्या देशाला भेट न देता त्याचे प्रत्यक्ष वर्णन देण्याची कला व वाचकांना बनविण्याची कला मराठी साहित्यात दिसून येते. बहुरूपी ही संस्था महाराष्ट्राच्या साहित्यात चिरपरिचित आहे. मनात विचार आला की, येताना रोमला उतरावे, सीझरची स्मारके पाहावीत, प्रसिद्ध टायबर नदी पाहावी, पोपचा मठ पहावा आणि रावणाच्या दरबारात अंगद जसा शेपटीची वेटोळी करून रावणाच्या सिंहासनाशी समस्तर होऊन शिष्टाई करीत होता, तद्वत् आपल्या ज्ञानाची वेटोळी करून पोपमहाराजाशी समस्तर होऊन धर्मसंवाद करावा, आणि ब्रह्मसूत्रापासून भेदिक लावणीपर्यंत आपल्या ज्ञानाचे वाण एखादा हुशार व्यापारी गिऱ्हाईकापुढें उघडून दाखवितो, त्याप्रमाणे उघडावे आणि ह्या महाभागाला आश्चर्यचकित करावे. मधेच मनाने पृच्छा केली की, त्या मठात जोगिणी असतील का ?

नंतर रोमचा आधुनिक इतिहास झपाझप डोळ्यांपुढून गेला. दुसऱ्या महायुद्धातील इटलीची लोकशाहीद्रोही कामगिरी लक्षात आली आणि जाणीव झाली की, मुसोलिनी मेला, त्याची प्रेयसीही मेली; आता नवा जमाना सुरू झाला आहे. जुन्या घटनेचे मुडदे उकरणे ठीक नाही. 'यात्रेकरूंनी निघावे' असा इशारा मिळाला आणि मग आम्ही सर्व विमानांत आलो. नंतर २॥ तासांच्या प्रवासाने फ्रँकफुर्ट ऑन मेन म्हणजे मेनकाठचे फ्रँकफुर्ट ह्या प्रसिद्ध पश्चिम जर्मनीतल्या शहरी आलो. ह्या २॥ तासांत प्रभात जन्म घेत

होती. खाली आल्प्स पर्वताचे दृश्य अस्पष्ट अस्पष्ट असे दिसत होते. आल्प्सचा लौकिक हिमालयापेक्षा जास्त वेळा ऐकला होता. कुळातील वंशावळीपेक्षा इंग्रजांच्या वंशावळी पाठ होत्या. आपल्या आजोबांना किती मुली होत्या, यापेक्षा आठव्या हेन्रीला बायका किती होत्या, याचे ज्ञान अधिक होते. ह्या शतकाच्या पहिल्या चतुर्थात ज्यांचे शिक्षण झाले, त्यांत मी आहे. औषधाच्या बाटल्यांवर जसे ते केव्हा तयार केले व कोठपर्यंत वापरावयाचे असे लिहितात, तसे माझ्या मनाच्या विचारयंत्रावर विसाव्या शतकातील ' पहिल्या चतुर्थातला बनेलो माल ' असे लिहिले होते. आणि मग साहजिकपणे आल्प्स पर्वताला नेपोलियनने कसे ओलांडले ते मनात येऊन सारा तत्कालीन इतिहास डोळ्यांपुढे उभा राहिला. आता युरोपियन सृष्टीतील प्रभात दिसत होती. पण प्रभाकराची किरणे दिसत नव्हती. घड्याळात ७॥ झाले असे आढळून आले. आणि माझ्या घड्याळात मी पाहिले तो ११॥ ची ती वेळ होती.

ह्या प्रवासात अनेक यात्रेकरू घडीघडीने घड्याळ लावीत होते. मी मात्र धैर्याने व धोरणाने जर्मन भूमीला पाय लागेपर्यंत हवेत एखाद्या राजकारणी माणसाप्रमाणे वारंवार मते बदलणारा नसल्याने घड्याळ बदलले नाही! पुष्कळ वेळा मनुष्याचे पोट घड्याळाप्रमाणे चहाची व जेवणाची वेळ ' पोटातील कावळ्यां ' मार्फत सूचित करीत असते. बरोबर त्याच वेळी सेविकेने सुहास्यवदनाने नाष्टा आणला आणि तो मी घेतला. ७-४० ला फ्रँकफुर्टच्या विमानतळावर उतरलो.

## मोक्ष मुल्लरची भूमी

मनात आनंद झाला की, मॅक्स मुलर, गटे, शोपेनहार, नित्शे इत्यादि नामवंत विद्वानांच्या देशाला मी आलो आहे. आणि त्याचबरोबर पहिल्या महायुद्धातील घटना ज्या कॉलेजियन जीवनात वाचल्या व दुसऱ्या महायुद्धातील घटना ज्या तुरुंगात वाचल्या व ऐकल्या त्यांची आठवण झाली. सारे सारे गाजले, गर्जले व गती घेऊन इतिहासाच्या प्रचंड गुहरात अगर गर्तेत स्मृतिशून्य झाले. तथापि, किती जरी रात्र काळी असली तरी दुसरे दिवशी उगवणारा सूर्य प्रकाशमानच असतो. नवचैतन्य देतो, नव आशा उदित करतो. फ्रँकफुर्ट विमानगृहात आम्ही आलो, आणि तेथून १॥ तासाने आमचा पहिला मुक्काम

इस्रायल ओलांडून आफ्रिका खंडात अर्धा तास मुक्काम करून हा किंचित् जगत्यात्री यूरोप खंडाच्या प्राचीन व प्रसिद्ध नगरीत उतरला होता. त्रिखंड पृथ्वी पाहिली, असे मला आता बोलण्याचा हक्क प्राप्त झाला. कीर्ति त्रिखंड गेली नाही. किंबहुना शनिवार पेठ तिने फारशी ओलांडलीच नाही. भारताच्या महानतेच्या महामंडळात सामान्य ताऱ्याप्रमाणे सुद्धा कीर्ति लुकलुकली नाही. तथापि, हिंदीमध्ये म्हण आहे की, 'आपआपके तानमें चिडियाँ भी मस्तान है!' (साध्या चिमणीला आपल्या चिवचिवण्यात तानसेनची तान आहे, असे वाटते). त्याप्रमाणे माझे मन अभिमानित झाले होते. आत्मगौरव त्यात स्फुरत होता. मार्कोपोलो अगर ह्यू-एन्-त्संग ह्या जगप्रसिद्ध प्रवाशांच्या आजूबाजूला कुठेतरी आपला नंबर आता लागेल, असा मनाने कौल दिला. आपण प्रवास-वर्णन लिहू, पाहिलेले व ऐकलेले तर लिहूच लिहू पण न पाहिलेले सुद्धा लिहू, न ऐकलेले सांगू असेही थोडे वाटले. कारण एखाद्या देशाला भेट न देता त्याचे प्रत्यक्ष वर्णन देण्याची कला व वाचकांना बनविण्याची कला मराठी साहित्यात दिसून येते. बहुरूपी ही संस्था महाराष्ट्राच्या साहित्यात चिरपरिचित आहे. मनात विचार आला की, येताना रोमला उतरावे, सीझरची स्मारके पाहावीत, प्रसिद्ध टायबर नदी पाहावी, पोपचा मठ पहावा आणि रावणाच्या दरबारात अंगद जसा शेपटीची वेटोळी करून रावणाच्या सिंहासनाशी समस्तर होऊन शिष्टाई करीत होता, तद्वत् आपल्या ज्ञानाची वेटोळी करून पोपमहाराजाशी समस्तर होऊन धर्मसंवाद करावा, आणि ब्रह्मसूत्रापासून भेदिक लावणीपर्यंत आपल्या ज्ञानाचे वाण एखादा हुशार व्यापारी गिऱ्हाईकापुढें उघडून दाखवितो, त्याप्रमाणे उघडावे आणि ह्या महाभागाला आश्चर्यचकित करावे. मधेच मनाने पृच्छा केली की, त्या मठात जोगिणी असतील का?

नंतर रोमचा आधुनिक इतिहास झपाझप डोळ्यांपुढून गेला. दुसऱ्या महायुद्धातील इटलीची लोकशाहीद्रोही कामगिरी लक्षात आली आणि जाणीव झाली की, मुसोलिनी मेला, त्याची प्रेयसीही मेली; आता नवा जमाना सुरू झाला आहे. जुन्या घटनेचे मुडदे उकरणे ठीक नाही. 'यात्रेकरूंनी निघावे' असा इशारा मिळाला आणि मग आम्ही सर्व विमानांत आलो. नंतर २॥ तासांच्या प्रवासाने फ्रँकफुर्ट ऑन मेन म्हणजे मेनकाठचे फ्रँकफुर्ट ह्या प्रसिद्ध पश्चिम जर्मनीतल्या शहरी आलो. ह्या २॥ तासांत प्रभात जन्म घेत

होती. खाली आल्प्स पर्वताचे दृश्य अस्पष्ट अस्पष्ट असे दिसत होते. आल्प्सचा लौकिक हिमालयापेक्षा जास्त वेळा ऐकला होता. कुळातील वंशावळीपेक्षा इंग्रजांच्या वंशावळी पाठ होत्या. आपल्या आजोबांना किती मुली होत्या, यापेक्षा आठव्या हेन्रीला बायका किती होत्या, याचे ज्ञान अधिक होते. ह्या शतकाच्या पहिल्या चतुर्थांत ज्यांचे शिक्षण झाले, त्यांत मी आहे. औषधाच्या बाटल्यांवर जसे ते केव्हा तयार केले व कोठपर्यंत वापरावयाचे असे लिहितात, तसे माझ्या मनाच्या विचारयंत्रावर विसाव्या शतकातील ' पहिल्या चतुर्थातला बनेलो माल ' असे लिहिले होते. आणि मग साहजिकपणे आल्प्स पर्वताला नेपोलियनने कसे ओलांडले ते मनात येऊन सारा तत्कालीन इतिहास डोळ्यांपुढे उभा राहिला. आता युरोपियन सृष्टीतील प्रभात दिसत होती. पण प्रभाकराची किरणे दिसत नव्हती. घड्याळात ७॥ झाले असे आढळून आले. आणि माझ्या घड्याळात मी पाहिले तो ११॥ ची ती वेळ होती.

ह्या प्रवासात अनेक यात्रेकरू घडीघडीने घड्याळ लावीत होते. मी मात्र धैर्याने व धोरणाने जर्मन भूमीला पाय लागेपर्यंत हवेत एखाद्या राजकारणी माणसाप्रमाणे वारंवार मते बदलणारा नसल्याने घड्याळ बदलले नाही ! पुष्कळ वेळा मनुष्याचे पोट घड्याळाप्रमाणे चहाची व जेवणाची वेळ ' पोटातील कावळ्यां ' मार्फत सूचित करीत असते. बरोबर त्याच वेळी सेविकेने सुहास्यवदनाने नाष्टा आणला आणि तो मी घेतला. ७-४० ला फ्रँकफुर्टच्या विमानतळावर उतरलो.

## मोक्ष मुल्लरची भूमी

मनात आनंद झाला की, मॅक्स मुलर, गटे, शोपेनहार, नित्शे इत्यादि नामवंत विद्वानांच्या देशाला मी आलो आहे. आणि त्याचबरोबर पहिल्या महायुद्धातील घटना ज्या कॉलेजियन जीवनात वाचल्या व दुसऱ्या महायुद्धातील घटना ज्या तुरुंगात वाचल्या व ऐकल्या त्यांची आठवण झाली. सारे सारे गाजले, गर्जले व गती घेऊन इतिहासाच्या प्रचंड गुहरात अगर गर्तेत स्मृतिशून्य झाले. तथापि, किती जरी रात्र काळी असली तरी दुसरे दिवशी उगवणारा सूर्य प्रकाशमानच असतो. नवचैतन्य देतो, नव आशा उदित करतो. फ्रँकफुर्ट विमानगृहात आम्ही आलो, आणि तेथून १॥ तासाने आमचा पहिला मुक्काम

म्युनिच शहरी झाला. कार्यक्रम–पत्रिकेत दुपारी १॥ वाजल्यापासून कार्यक्रम ठेवलेला होता. विमानगृह इतके स्वच्छ होते की, केर औषधाला सापडत नव्हता. सिगारेटची थोटके कोणी जमिनीवर टाकीत नव्हते; आणि मुंबईला जशी लोकलगाडी ५-५ मिनिटाला सुटते, त्याप्रमाणे एक यंत्र घेऊन सेवक साऱ्या विमानगृहाची फरशी विजेच्या जोरावर स्वच्छ करीत होता.

ह्या विमानगृहात पासपोर्ट, सामान वगैरेची व्यवस्था होत असताना तिघे-चौघे हिंदी भेटले. एक नायर केरळांतील, एक बंगाली कलकत्त्यातील, आणि एका मद्रासी दिल्लीतील. कारण दिल्ली हे आता मद्राशांचे इडलीघर झाले आहे. त्यांच्याशी इंग्रजीत बोलण्याला माझा स्वाभिमान 'तयार' नव्हता. आणि ह्या कालबिंदूत देशाभिमान व स्वाभिमान एकरूप झाले होते. केरळ-कोकिळ म्हणाला, 'मला हिंदुस्थानी येत नाही, संस्कृत येत नाही, इंग्रजी व मल्याळी चांगले येते.' त्याच्याशी थोडे बोललो, अर्थात् इंग्रजींत. आणि म्हणालो की, 'क्षणभर प्रेत बोलते आहे असे समज. हिंदी अवघड नाही.' तेव्हा त्याने 'अच्छा' असा शब्द काढला. मी म्हणालो, पहिला विजय मिळवला. नंतर मद्राशाची चौकशी केली. मद्रासी म्हणजे जशी पाहिजे त्या रंगाची कॉफी. परिस्थितिसापेक्ष त्याची मते व व्यक्तित्व असते. दिल्लीत आला म्हणजे दहीवडा खाईल. शिवछत्रपतींच्या पुण्यात आला म्हणजे चिवडा खाईल; कलकत्त्याला गेला म्हणजे संदेश घेईल. ह्या त्याच्या सर्वोदयी व सर्वत्र उदयी स्वभावधर्माने त्याने इंग्रजी शब्दांना हिंदी विभक्त्या लावून भाषणाचे व्याकरण आकर्षित केले. बंगाली गृहस्थाला हिंदी येत नव्हते असे नव्हे. पण सोनार बंगला आणि गंगेतील मासळी ह्याचा अभिमान त्याला इतका असतो की जग हे त्याला दशांगुले तरी उरते. म्हणून त्याने माझ्याशी संस्कृतमध्ये बोलण्यास सुरुवात केली आणि मराठयांचा गनिमी कावा परदेशात एका मराठयावर वेधण्याचा त्याने प्रयत्न केला. मीही कमी नव्हतो. आणि पुण्यातील सर्व महाभागांना मनात आठवून त्याला बंगालीत उत्तर देण्यास सुरुवात केली, जिचे ज्ञान मला खंडित पाव रतीइतके पण होते. आणि ही शठं प्रति शाठ्यं नीती यशस्वी झाली. मग त्याने उर्वरित क्षण दोन क्षण तुळशीदासाने पावन केलेल्या मंगलमय हिंदीत बोलण्यात खर्चिले. त्याची हिंदी भाषा संस्कृतप्रचुर होती. उच्चार ओबडधोबड होते. तथापि ती सार्थ होती.

माझ्याबरोबर सहयात्री असलेल्या मिसेस कमलिनी भन्साळी ह्या गुजराथी. त्या माझ्याशी प्रवासात मराठीत बोलत. हेल गुजराथी. मी त्यांचेशी गुजराथीत बोले आणि तीन आठवड्यांच्यानंतर असे आढळून आले की, त्यांचे मराठी सुधारले व माझे गुजराथी. आणि ह्या सौद्यात राष्ट्रभाषा हिंदीचा अभाव कुणालाच नडला नाही !

आम्ही दोघांनी असे ठरविले की, आपण येथे पोचल्याची तार करायची. खिशातून ऐटीने बँकरकडून मिळालेला चेक तिथल्या नानावटीकडे हजर केला. त्याने सांगितले की, चेक वटवावा असा शिक्का मागे आहे पण देशांच्या नावाच्या सदरात एकाही नावाचा उल्लेख नाही. आणि क्षणात पुण्यातील संबंधित बँकेची कार्यक्षमता आणि माझी सावधानता, दोघांची बेअब्रू मनाच्या बुधवार चौकात ठळकपणे झालेली दिसून आली ! सहयात्री भन्साळींनी मग आपले चेकबुक काढले. त्यात देशांची नोंद होती म्हणून तिने लागलीच १०० मार्क घेतले. तिच्याही बाबतीत तशीच परिस्थिती झाली असती तर आमचे काय हाल झाले असते ह्याचे वर्णन न करणे बरे ! पुण्या-मुंबईत ऐटीत हॉटेलात जावे आणि बिल येताच पाकीट घरी विसरल्याचा बहाणा करावा असे ते दृश्य दिसले असते. तथापि, कसब्याच्या मंगलमूर्तीने व तांबड्या जोगेश्वरीने पुण्यातील आपल्या लेकराची अब्रू राखली ! मग आम्ही प्रथम जवळ उभ्या असलेल्या–तगादेदार वृत्तीने नव्हे–पोर्टरला रुबाबाने २ मार्क दिले. आमचेबरोबर विमानतळाचा अधिकारी होता. कारण त्याला आम्ही सरकारी पाहुणे आहोत–चिमणराव स्टाइलचे नव्हे, खरे खरे – अशी सूचना होती. नंतर तार ऑफिसकडे आम्ही गेलो आणि सुखरूप पोहोचल्याची पुणे युनिव्हर्सिटीला तार केली व घरी व कमलिनीच्या घरी कळविण्यास सांगितले. यात निदान ११ मार्क्स् म्हणजे १३-१४ रुपये वाचवले. त्या केबलला १४ मार्कस् पडले. कारकुनाने ती लिहून घेतली, लागलीच ती टाईप झाली आणि मोड घेईपर्यंत २ मिनिटांत ती धाडली गेली, असे त्याने आम्हांला सांगितले. व्हर्नाक्युलर आदमी असल्यामुळे मी त्यांना म्हणालो की, ( अर्थात् इंग्रजीत ) शक्य तितक्या लवकर पोचेल असे करा. त्याने सांगितले की, जर्मनीहून ती गेली, त्यावेळी तेथील ९॥ वाजले होते. आणि ती केबल पुण्याला अवघ्या ½ तासात पोचली असे कळले. आमचेकडे तार अगर एक्सप्रेस डिलिव्हरीचे पत्र साधारण पत्रापेक्षा उशीरा जाते.

प्रातर्विधीसाठी म्हणून तेथील गृहात गेलो. दार उघडेना. मग तेथील परिचारिकेने सांगितले की, १० सेंटचे नाणे त्या भोकात टाकल्याशिवाय दार उघडणार नाही. त्याप्रमाणे केले. शौचमुखमार्जन करून बाहेर आलो आणि असा अनुभव आला की, जेवणाप्रमाणे शौचासही पैसे द्यावे लागतात! मग कमलिनीजवळून तशी ७–८ नाणी घेतली आणि मुंबईला पोचेपर्यंत जवळ बाळगली. फ्रँकफुर्ट शहरात जायला वेळ नव्हता. कारण म्युनिचचे विमान तासात सुटणार होते. मग आम्ही वर रेस्टॉरंटमध्ये गेलो. पहिल्या पायरीवर उभा राहिलो व आपोआप वर गेलो. पाय न हलवता उच्च स्थळ गाठले. राजकीय पक्षात वशिल्याने पहिल्या पायरीवर उभे केले जावे व कारस्थानी यंत्रणेने प्याद्याचा फर्जी व्हावा, कारकुनाचा कारभारी व्हावा तसेच झाले. जिना चढावयाचा नाही, हे व्रत अक्षरशः पाळले गेले! आम्ही कॉफी घेतली आणि मग माझी सहयात्री आपल्या पतिराजाला पत्र लिहावयास बसली. तिने विचारले, तुम्ही तुमच्या सौ.ला पत्र लिहिणार नाही का? मी म्हणालो, लिहिण्यासारखे आता ह्या सत्तरीत काही राहिले नाही आणि तार पोचलीच असेल.

विमानाची ललकारी झाली. तथापि ह्या शकुंतलेचे पत्रलेखन चालूच होते! मला थोडा राग आला; पण दुर्वासी टाईपचा नव्हे. त्यामुळे मजकडे तिने लक्ष दिले नाही, म्हणून शापही द्यावा असे वाटले नाही. अभिजात विनोदवृत्तीने मी म्हणालो की, 'कमलिनी, म्युनिचलासुद्धा पत्रे घेतात!' मग तिने धांदलीमध्ये पत्रे पुरी केली, पाकिटात घातली आणि जिव्हेच्या लाळेने तिकिटे आर्द्र करून पाकिटे बंद केली व पोस्टात टाकली. मनात म्हटले की, ह्या धांदलीत मुलाचे पत्र बापाच्या पाकिटात व बापाचे पत्र मुलाच्या पाकिटात घातले नसले म्हणजे मिळवली! मग विमानात हा विनोद तिला सांगितला. तिला माझी सातवी मुलगी मानले होते. तिला तिलोत्तमा नं. २ असे नाव दिले. काव्य अगर शास्त्र नसले तरी विनोदाने आमचा प्रवासकाल चालला होता. सुमारे एक तासात म्हणजे पावणे अकराचे सुमारास आम्ही म्युनिचला पोचलो. तेवढ्या तासाच्या प्रवासात प्यायला काय पाहिजे असे ४ वेळा तरी सेविकेने विचारले. ती सेविका किमान ६ फूट तरी उंच होती. भाग्याची गोष्ट की, ती स्थूल नव्हती. नाही तर कठीण प्रसंगच आला असता! पण बोलणे आर्जवी, वागणे मधुर आणि त्यामुळे नाही कसे म्हणावयाचे म्हणून कॉफी घेतली व अगदी वेळेवर म्युनिचच्या

विमानतळावर उतरलो. ह्या प्रवासात पाऊस पडत होता, पण त्याचबरोबर मधून मधून सूर्यप्रकाशही दिसत होता. सोंगट्यांच्या डावात ज्याप्रमाणे सारखे सारखे १० पडू नयेत म्हणून मध्ये ६ पडावे, त्याप्रमाणे ऊन व पाऊस या मध्ये धुक्याचे ६ पडत होते. म्युनिचच्या विमानतळावर उतरताच हिटलर आणि चेंबर्लेन यांच्यातील म्युनिचच्या कराराची आठवण झाली. आमच्या कार्यक्रमातील म्युनिच हा पहिला मुक्काम होता. विमानातून उतरून विमानगृहात येताच एक तरुण माझी खादी टोपी पाहून व बरोबर साडी नेसलेली हिंदी स्त्री पाहून जवळ आला व त्याने विचारले की, 'तुम्ही डॉ. गाडगीळ का?' खादी टोपी घातल्याने किती पटकन् माझी ओळख पटली! आणि यामुळे खादीचा भाव माझ्या मनात शेअरबाजारात गोंधळ उडवील एवढा चढला!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५०३०

# छत्री म्युनिच : : २

असे सांगतात की, शिवाजीमहाराज रायगडावर सहल करीत असताना ऊन लागू नये म्हणून हुजऱ्या त्यांच्यावर छत्री धरून बरोबर चालला होता. एवढ्यात वावटळ आली व तो कड्याचे बाजूला अंतराळात पडला. महाराजांनी त्याला सांगितले की, छत्री घट्ट धर आणि त्याने तसे केले. व सुरक्षितपणे तो छत्रीसह महाडजवळील निजामपूर गावी उतरला व तेव्हापासून त्या गावाला 'छत्री निजामपूर' असे नाव पडले. १९३८ साली इंग्लंडचा मुख्य प्रधान चेंबर्लेन ह्याने आपल्या हातातील छत्री चर्चिलच्या तोंडातील चिरूटाप्रमाणे जागतिक विनोदाचा विषय केली होती व व्यंगचित्रकारांना कित्येक महिने स्फूर्तिप्रदानी केली होती. मी जे नामकरण केले, ते योग्य होते, असे माझे मन तरी मला सांगते. आम्ही उतरलो तो दिवस न कर्त्याचा वार म्हणजे शनवार होता. रिम विमानतळावरून मिस्टर हेस ह्यांनी आम्हांला होटेल एक्सेलसियरमध्ये आणले. वाटेमध्ये आमची मिनिटामिनिटाची कार्यक्रमपत्रिका त्याने मला दिली.

होटेलमध्ये पोचताच आम्हांला खोलीच्या किल्ल्या देण्यात आल्या. आमचे सामान एका लिफ्टने वर गेले; दुसऱ्या लिफ्टने आम्ही वर गेलो. जे भोवताली दिसत होते ते सर्व अगदी नीटनेटके, जणू काही चित्रपट घेण्यात येत आहे, आणि त्या चित्रपटात मी काम करीत आहे. माझ्या साहित्यिक मनाने त्या चित्रपटाचे नाव 'वावळट यात्री' असे ठरवलेही.

आमचा मार्गदर्शक ऊर्फ वाटाड्या हा खाली बसला; व आम्ही दोघे अर्ध्या तासात स्नान वगैरे करून भोजनगृहात आलो. खोली प्रशस्त होती. सर्व यंत्रमय होते. मनसोक्त ऊन पाण्याने आंघोळ करून, हळूच सांगतो, परटाची व्यवस्था काय आहे, ह्याची कल्पना नसल्याने शर्ट व बारकी विजार धुऊन त्या वातानुकूल खोलीमध्ये वाळत टाकून खाली आलो होतो !

भोजनात काही अडचण वाटली नाही. ब्रेड, बटाटे, लोणी, उकडलेल्या भाज्या व फळे ह्यांच्यावर हात मारला. द्राक्षाचा ताजा रस घेतला व कॉफीच्या कपाने भोजननिबंधाचा उपसंहार करून प्रेक्षणीय स्थळे पाहण्याच्या कार्यक्रमाला तयार झालो. दोन वाजता आम्ही बाहेर निघालो.

आमचा वाटाड्या हेस हा म्युनिच युनिव्हर्सिटीतील एक विद्यार्थी होता. आणि सर्व माहिती व्यवस्थित रीतीने तो आम्हांस सांगत होता. निम्मे म्युनिच युद्धामध्ये बॉंबच्या हल्ल्याने जमीनदोस्त झाले होते. आता तर तेथे पडके घर औषधाला सुद्धा शिल्लक नव्हते! रस्ते प्रशस्त होते आणि मोटारी मुंग्यांच्या रांगा लागाव्यात त्याप्रमाणे रस्त्यांतून स्तब्ध अगर गतिमान् अशा दिसत होत्या. ज्यावेळी विमानतळाहून गावात आलो, त्यावेळी मोटारींची गर्दी पाहून ' आज काय कार्यक्रम आहे ? ' असे मी वाटाड्याला विचारले. मनात असा भाव आला होता की, माझ्यासारखा महान् गृहस्थ म्युनिचला येणार म्हणून माझ्या निवासस्थानी ह्या मोटारी जात असाव्यात ! पण मोटारींना गॅरेजेस नाहीत म्हणून त्या रस्त्यात ठेवतात असे त्याने सांगितले. ३ माणसांमागे १ गाडी असे जर्मनीत गाडीचे प्रमाण आहे, असे ऐकून मला समाधान झाले. पण मनात उद्भवलेल्या अहंतेचा गर्वपरिहार झाला ! आम्ही रस्त्यामागून रस्ते हिंडत होतो. मध्ययुगीन राजाचा वसंतविलास राजवाडा पाहिला. तेथे ठेवलेली उत्कृष्ट चित्रे पाहिली, तसबिरी पाहिल्या; अन्य गोष्टी पाहिल्या व परंपरेचे ते किती भोक्ते आहेत, हेही पाहिले. त्यानंतर आम्ही म्युझिअम पाहिले. त्या ठिकाणी जवळ जवळ २ तास आम्ही काढले. सबंध म्युझियम पाहणे शक्य नव्हते व घाईघाईने पाहायचे म्हटले तरी ८ दिवस लागले असते. विभागशः व्यवस्था होती. मग स्थापत्यविभाग व शस्त्रागारांचा भाग पाहिला. तऱ्हेतऱ्हेचे पूल, त्याचप्रमाणे मोठमोठाल्या बांधांची प्रतीके, विजेचे उत्पादन, विजेची वाहतूक, आणि पुलांचे नमुने पाहिले. १ तास शस्त्रविभागात काढला. सामान्य

भाला-बरच्यांपासून ते अद्ययावत् शस्त्रांपर्यंत मांडणी केली होती. श्रीमती भन्साळीने शिशुविभाग पाहिला आणि खूष झालेली दिसली. नंतर आम्ही शिल्प व कला-विभाग पाहिले. प्राचीन व मध्ययुगीन शिल्पांचे व कलांचे नमुने पाहून तर आम्ही थक्क झालो. ज्यांची ज्यांची म्हणून नावे प्रसिद्ध होती, त्या त्या सर्वांच्या कौशल्याचे प्रदर्शन आम्हांस पाहावयास मिळाले.

दुपारी आम्ही हॉटेलमध्ये जेवलो होतो, चहा रॅट किलर ह्या हॉटेलमध्ये घेतला. तिथे इतकी गर्दी होती पण सर्व काही यंत्राप्रमाणे चालले होते. मनुष्य टेबलाजवळ येऊन बसला की, लागलीच पदार्थांची यादी. त्या यादीत पेये, खाद्ये, सुरुवातीचे भाज्या इत्यादि विभाग असत आणि माझ्या समजुतीने जवळ जवळ १०० चे वर पदार्थ मिळू शकतील अशी ती यादी जाहिरात देणारी होती. यादी पाहून गिऱ्हाइकाने सांगावे व सांगितलेल्या पदार्थानुरूप अर्ध्या तासाचे आत सर्व पदार्थ गरम आणि टेबलाचे मध्यभागी यावे अशी व्यवस्था होती. मग एक विजेची शेगडी ठेवून तीवर ते पदार्थ ठेवले जात. चिरीमिरी बिलामध्येच समाविष्ट केली जाई. आमच्या लहानपणी ब्राह्मणाला दोन दक्षिणा देत. एक साधी व एक भूयसी. असेच बिलाचे पैसे व टिप्सचे मिळूनच आकडा तयार होई.

## जर्मनीचे पुनर्वसन

हेस याने मग आम्हांला गावाबाहेर नव्या वस्तीत नेले आणि दुमजली, प्रशस्त पण अलग अशा इमारती हजारोंनी निर्माण झालेल्या त्याने दाखवल्या. बेघर झालेल्यांची ती नवी व्यवस्था होती. एवढेसे पानशेत झाले, कोटी रुपयांच्यावर फंड जमला पण भ्रष्टाचार व बेअकलीपणाचा मूर्तिमंत पुरावा म्हणजे पुण्यातील पुनर्वसन प्रश्नाचा इतिहास होय! तेथे रस्त्यात कोठेही घाण नाही. रस्त्यातून म्हणजे लांबच्या रस्त्यातून ( ऑटोबॉन ) कमी वेगाने जाणाऱ्याला दंड होतो.

नंतर आम्हांला टेलिफोन फॅक्टरी दाखविण्यात आली. दहामजली व डोंगराएवढी प्रचंड होती ती. युद्धातील खंडणी म्हणून पूर्वीची जुनी फॅक्टरी रशियाने उखडून रशियात नेली होती. आता त्याठिकाणी चौपट आकाराची व दसपट उत्पादन करणारी फॅक्टरी निर्माण झाली होती. पराभवाने पराक्रमाला वाव दिला, दुःखातून सौख्याचा मनोरा उभा केला. दैवावर पुरुषार्थाने विक्रम मिळवला;

आणि मला वाटते, हाच संदेश घरोघर देशी, परदेशी लोकांना सांगणारी ही टेलिफोनव्यवस्था जर्मनीतील विद्यमान् पिढीने केली आहे. तेथील घड्याळाप्रमाणे दोन वाजता निघून ९ वाजता हॉटेलमध्ये परत आलो. फ्रँकफुर्टलाच माझे पुणेरी घड्याळ जर्मनीतील कालाला अनुकूल करुन घेतले होते. मला वाटले जेवायला अवकाश असेल. पण तेथील पद्धत अशी दिसली की, संध्याकाळी ७ वाजल्यापासून जेवणाचा काल सुरू होतो.

त्या दिवशी रात्री नॅशनल थिएटर–राष्ट्रीय नाट्यमंदिरमध्ये प्रसिद्ध नाटककार व्हेरदी ह्याचा 'डॉन कॅरोलास' हा नाट्यप्रयोग व्हावयाचा होता आणि त्याची तिकिटे आम्हा दोघांसाठी सरकारतर्फे राखून ठेवण्यात आली होती. बरोबर संध्याकाळी ७ वाजता हेस याने आम्हांला एक्सेलसियर हॉटेलमधून टॅक्सीतून थिएटरकडे नेले. ते थिएटर बॉबहल्ल्यात निकालात आले होते. पण त्याचा आता कायाकल्प झाला होता. प्रत्यक्ष रंगभूमी जवळ जवळ १०० फूट लांब आणि ५० फूट रुंद होती. एकावेळी २००–३०० माणसे सहज वावरतील एवढी ती प्रशस्त होती. क्षणभर असे म्हणा ना की, शिवाजीमंदिराच्या आवाराइतका तिचा व्याप होता. प्रेक्षकांची गॅलरी वर्तुळाकार होती. तळ मजला सोडून ३ मजले होते. नादव्यवस्था सुंदर होती. ओव्हर-कोटाशिवाय कोणीही नव्हते. आणि मीही तसाच आच्छादित होतो. तथापि प्रत्येक व्यक्ती आत शिरताच त्या त्या मजल्यावर ओव्हरकोट ठेवीत; एक बिल्ला मिळे. तो बिल्ला व १० सेंट परत दिले म्हणजे परत जाताना कोट मिळे. मला असे वाटले की, देवदर्शनाला जाताना जोडे ठेवण्याची अशी व्यवस्था केली तर किती छान होईल!

भूमिका करणाऱ्या साऱ्या बाया होत्या. प्रत्येक मजल्यावर पेयगृह होते. आमची जागा ज्या ठिकाणी राज्याचे पाहुणे बसतात त्या ठिकाणी होती. आम्ही दोघे व हेस असे बसलो होतो. हेस आम्हांला नाटकाचे कथानक सांगत होता. एकेक प्रवेश भव्य होता. मग तो अरण्याचा असो, राजवाड्याचा असो अगर तुरुंगाचा असो. सर्व काही भव्य व मनापासून कलायुक्त घडवून आणले होते. प्रत्येक खुर्चीवर नाटकाचे कथानक व काही सुंदर चित्रे असलेले असे छोटे पुस्तक ठेवलेले असते. २ तास नाटक चालले. मध्यंतराला आम्ही बाहेर आलो आणि गोकुळात राहून ब्रह्मचारी असावा त्याप्रमाणे त्या जलशात मद्याला स्पर्श न करणारा असा मी होतो. नाटकात मद्याला मज्जाव होता. रंकापासून रावापर्यंत

सारी पात्रे गात होती. आणि ह्याचेच नाव ऑपेरा असे सांगण्यात आले. प्रवेशाचा पडदा पडला म्हणजे टाळ्या पडत व पुन्हा ती पात्रे बाहेर येत, प्रणाम करीत. काही काही वेळा हे टाळीवादन तीन-तीन वेळा होई. कथानक मध्ययुगीन होते. पोशाख अनुरूप, सजावटही तशीच. आपल्याकडे वसिष्ठ ऋषी शर्ट घालून आशीर्वाद देतात व बोलताना जुने विचार नव्या भाषेत व उद्याच्या चुका एकत्रित करून पराक्रम करतात, तसे तेथे नव्हते. आणि त्यामुळे त्या काळाचे वातावरण रंगमंचावर प्रतिबिंबित झालेले दिसे. ज्या स्थानावर आम्ही बसलो होतो, त्याकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले होते. माझे धवलमौली डोकें म्हणजे पांढरी टोपी व कमलिनीची काठेवाडी साडी पाहून स्त्री आणि पुरुषांना कुतूहल वाटत होते. रात्री ११ चे सुमारास परत आलो. मग पथिकच्या दुसऱ्या भागाचे थोडे लिखाण केले. किंबहुना ह्या तीन आठवड्यांच्या प्रवासात मोठ्या प्रमाणात लिखाण केले. पुण्यात घरी उजाडल्यापासून तुळशीबाग व विद्यापीठात बेलबाग ! गर्दी खूप. फरक इतकाच की, तुळशीबागेत, बेलबागेत तांदूळ तरी टाकतात, तेही नव्हते आणि सध्या तर ते दुर्मिळच झाले आहेत. तात्पर्य, दर रात्री २ तास मी लिहीत असे.

१ नोव्हेंबर हा रविवार होता. आणि हा विश्रांतीचा दिवस. पण जगातील सर्व व्यवहार जसे चालूच असतात, त्याप्रमाणे येथेही होते. ता. ३० ऑक्टोबरला रात्री म्युनिच येथे मोठे वादळ होऊन आल्प्समध्ये बर्फवर्षाव झाला होता, असे कळले. आणि ता. ३१ ला सकाळीच आम्ही म्युनिच नगरीत प्रवेश केला होता. बंगालचे मुख्य प्रधान डॉ. रॉय मला नेहमी कॉंग्रेसमधील वादळी गृहस्थ म्हणत आणि मी त्यांना सांगे की, आयुष्यात एवढेच चुकीचे निदान तुम्ही केले आहे ! म्युनिचमध्ये वादळ झाले आणि मी आलो. माझ्यामुळे ते झाले, असा आरोप कुणी करणार नाही. हिंदुस्थानात काही भविष्य वर्तविले तर, वर्तविणारानेच ते घडवून आणले, अशी टीका करणारे महाभाग असतात. हा माझा संयुक्त महाराष्ट्रातील चळवळीतला ताजा अनुभव होता. ३१ ऑक्टोबरला दुपारीच हेस म्हणाला की, अकाली वादळ झाले आहे, आल्प्समध्ये बर्फ पडला आहे. उद्याला आल्प्स पर्वतावर जावयाचे आहे. मी मनात म्हणालो, फार चांगली गोष्ट झाली. हिमालयातील बर्फ पाहिला होता. धवलागार, सिमला, नारकांडा, रोइटंक पर्वतावरही गेलो होतो आणि सहकुटुंब बर्फाच्या वातावरणात फोटो

काढून घेतला होता. आता एकट्याचाच काढावा लागणार, असाही विचार रसिक मनाला गुंगवून गेला.

## प्रभाते हिमदर्शनम्

ता. १ ला सुप्रभाती उठून चहा व नाष्टा करून ९ वाजता आम्ही निघालो. सकाळी चहा, चहाचे वेळी वर्तमानपत्र, ते वाचताना चर्चा हा ४० वर्षांचा कार्यक्रम जो तुरुंगातही कायम होता, त्याला येथे थोडा खंड पडला. वर्तमानपत्रे होती, पण जर्मन भाषेतील. त्यातील एकात २ मोठे पाहुणे म्युनिचमध्ये आले आहेत, एवढा उल्लेख होता. तो हेसने वाचून दाखविला, बरे वाटले. मी हेसला विचारले की, 'इथे इंग्रजी वर्तमानपत्रे मिळतात की नाही?' त्याने सांगितले, ११ वाजता 'न्यूयॉर्क टाईम्स', 'मँचेस्टर गार्डियन' वगैरे आजच्या तारखेचे मिळेल. मला हुशारी आली. तथापि, आल्प्सला निघताना हे पाथेय नव्हते, ही गोष्ट काही खोटी नाही. एका दृष्टीने ते बरे झाले. कारण मनसोक्त सृष्टि-निरीक्षण करायला फुरसत मिळाली. तेथील पद्धतीप्रमाणे कंपनीची गाडी सरकारने ठरवली होती. ड्रायव्हर ठरवला होता, आणि हेस व आम्ही दोघे बव्हेरियन आल्प्सवर स्वारी करण्यासाठी निघालो. युरोपच्या इतिहासात व नेपोलियनच्या चरित्रांत आल्प्सबद्दल वाचले होते. तेथले साधू, त्यांचे मठ, त्यांची कुत्री, तेथील जोगिणी ह्या सर्वांबद्दल चांगले व वाईट वाचले होते. त्यांचा सेवाभाव मनाला आकर्षक वाटला होता. आल्प्स् पर्वतावरून पराक्रमाची पावले तुडवून झालेल्या नेपोलियनच्या स्वाऱ्या वाचल्या होत्या आणि मन मोठे उत्सुक झाले होते.

निघताना थंडी खूप होती. अगदी शरीराला जवळ, चिकटून मलमलची पैरण होती, तीवर लोकरीचा गंजीफ्रॉक होता, त्यावर चिरंजीवांनी पुरस्कारलेला लिबर्टी शर्ट होता, त्यावर पंजाबमधील एका भगिनीने विणलेला स्वेटर होता, त्यावर वुल्नचा गळेबंद कोट होता, आणि जेवणात जसे 'मधुना समापयेत्' ह्या नात्याने ओव्हरकोटने पूर्णता केली होती. ह्या सर्व कपड्यांचे ओझे सव्वा मणाच्या लाक्षणिक बेडीइतके नसले तरी चांगलेच जड होते. येणेप्रमाणे सशस्त्र नसलो तरी सवस्त्रसज्जित होऊन आल्प्सच्या दिशेने म्युनिच सोडले. आमच्या मोटारीचा ड्रायव्हर मला पाहिजे तसा म्हणजे गप्पीदास मिळाला. वाटाड्या

हेस हा जरी स्नातकोत्तर विद्यार्थी होता, तरी तो दुय्यम ठरला. तथापि, आयुष्यात असा अनुभव आहे की, विविध व मनोरंजक माहिती ही न्हाव्याच्या दुकानी व वाहतुक करणाऱ्याकडून मिळते. पुण्यातील टांगेवाला ही एक ऐतिहासिक संस्था आहे. आता ती दुर्मिळ होत चालली आहे. तथापि रिक्षावालेसुद्धा तीव्रतेने व त्वरेने गाडी हाकत असले तरी मधून मधून गप्पा मारतातच, आणि त्या मोठ्या सुरम्य असतात. म्युनिचपासून जवळ जवळ ४-५ मैल त्या नगरीच्या उपनगरातून आमची गाडी जात होती. ती सारी उपनगरे निर्वासितांना वसविणारी होती. कोठेही अस्वच्छता नव्हती. योजनेने काम केले होते. टिळक रोड जसा नवा कसबा ठरला तसे येथे झाले नव्हते. दुमजली अगर दीड मजली टुमदार गृहे होती. सुसज्जित, बहुतेक वातानुकूल, भोवतालचे वातावरण प्रसन्न असे दृश्य होते. म्युनिचमधील सरकारने काय केले, काय कर्तृत्व दाखविले, त्याची ती साक्ष होती. हेसने आकडे देऊन माझ्यातील अर्थशास्त्रज्ञ गारठून टाकला. सारथ्याने मग आपण साऱ्या युरोपभर गेल्या १० वर्षांत किती अमेरिकन व अन्य यात्रेकरूंना घेऊन हिंडलो ह्याचा तपशील सांगितला. मी त्याला सहज विचारले व त्याने सांगितले की, रेल्वे, विमान यांपेक्षा कंपनीची स्वतंत्र गाडी घ्यावी आणि सारा पश्चिम युरोप हिंडावा, हे अधिक सोईस्कर व कमी खर्चाचे पडते. रस्त्यातून जाताना ठिकठिकाणी वेगाबद्दल पाट्या लावल्या होत्या. त्यांत ' अमुक किलोमीटरपेक्षा कमी वेगाने जाऊ नये ! ' अशा पाट्या होत्या. किमान वेगावर मर्यादा होती. कमाल वेगावर नव्हती. जणू काही आमचा शारदा ॲक्टमधीलच अभिप्राय व्यक्त होत होता. लग्न करावे की नाही, मार्गदर्शन नाही. केव्हा करावे ? खुलासा नाही. १५ वर्षांखालील मुलीचे व १८ वर्षांखालील मुलाचे केल्यास मात्र शिक्षा, हा ॲंग्लो-भारत संस्कृतीचा दंडक येथे आहे.

आम्हांला साठ मैल जावयाचे होते. १-२ खेडेगावे पाहावी, असे मी सुचविले होते. आणि म्हणून दोन ठिकाणी थांबलो. पण ती खेडेगावे – वस्ती थोडी म्हणूनच. अन्यथा स्वच्छ घरे, सुंदर रस्ते, फरसबंद अगर काँक्रीटचे, राजरस्ते ( Autoban ) म्हणजे धूळ गैरहजर, प्रशस्त व एकावेळी एका दिशेने ४ गाड्या जातील एवढी व्यवस्था. गाडी बाजूला टाकून पुढे जायचे असेल तर, मधेच एक रस्ता मोकळा सोडलेला. इकडे गाड्या उजव्या बाजूने हाकतात. मी

सहज म्हणालो की, भारतात आम्ही डाव्या बाजूने जातो, पण उजवे राजकारण करतो. येथे त्याच्या उलट दिसते! रस्त्यात आम्ही एका खेडेगावात कॉफी पिण्यासाठी उतरलो त्यावेळी ११ वाजले होते. आणि सूर्यनारायण नुकताच ढगांशी झुंज देऊन 'उजळीत श्रियेची राउळे' असे करत प्रकाशमान झाला होता. 'अभ्यासेविना प्रगटला' असा तो नव्हता. आणि त्यामुळे सर्वत्र आनंद, उत्साह लोकांमध्ये दिसून येत होता. पण तिकडील सकाळचे ऊन इकडील दुपारच्या उन्हाइतके लागत होते, असा अनुभव आला. कॉफी घेऊन काही माहिती गोळा करावी, असा संकल्प केला, पण फारसे जमले नाही. तेथील स्थानिक स्वराज्याची माहिती हेसकडून घेतली. जर्मन म्हणजे पद्धत व शिस्त. ही त्यांच्या स्वभावात, त्यांच्या वर्तनात, त्यांच्या कारभारात दिसून येते. ह्या उलट इंग्लंड–अमेरिका म्हणजे खूप वादविवाद उदाहरणा-उदाहरणाने मार्ग काढावयाचा. नकाशा काढून प्रवास करावयाचा. योजना करून काम करावयाचे ही जर्मन वृत्ती. इंग्लिश वृत्ती म्हणजे काठी टेकत टेकत अनुभवग्रंथ रचावयाचा. ज्ञानापेक्षा अनुभवावर भिस्त अधिक, हा इंग्रजी स्वभाव. भारतात ह्या दोन्हींतील दोष मोठ्या प्रमाणात दिसून येतात, हा विचार मनामध्ये आला.

गप्पा मारीत मारीत आल्प्सच्या पायथ्याशी आलो. वळणे घेत घेत, बर्फ पाहात पाहात डोळे पांढरे व्हायची वेळ आली. म्हणजे सर्वत्र बर्फच बर्फ दिसत होता. गोऱ्या चेहेऱ्यावर दृष्ट लागू नये म्हणून वैष्णवी काळी रेघ काढावी, त्याप्रमाणे रस्ता दिसत होता. झाडांवर बर्फ होता. काहींनी त्याला फेकून दिले होते. पण पृथ्वी तो फेकून देण्याचा विचारसुद्धा मनात आणीत नव्हती. 'ज्यासी ज्यासी आकार त्यास पृथ्वीचा आधार' ही रामदासांची उक्ती आठवली.

माणसे टाकतील, अवकाश व आकाश दूर सारील, अशा सर्व रजःकणा-पासून, रंकापासून राजापर्यंत जिवंतपणी व मृत्यूनंतर जिने सर्वांना आधार व अभय दिले आहे, ती एक पृथ्वी होय. आणि तिच्या सौजन्याचा फायदा बर्फाने घेतला होता. मुळातील तिचे स्वरूप मला त्या दोन तासांच्या प्रवासांत दिसले नाही. नागमोडी वळणे घेत घेत, चढउतार करीत करीत २-३ ठिकाणी प्रचंड विद्युत् उत्पादन-केंद्रे पाहात पाहात आमची गाडी ऑस्ट्रियाचे हद्दीपर्यंत आली, आणि तेथून ऑस्ट्रियाचे हद्दीतून १० मैलांचे वळण घेऊन पुन्हा आम्ही बव्हेरियाचे हद्दीत आलो पासपोर्ट मजजवळ होता. पण त्या तेवढ्या

अतिक्रमणाला आतिथ्य मानले गेले होते, म्हणून कोणी चौकशी केली नाही, कोणी चेहरे न्याहाळले नाहीत. आमचेजवळ किती चलन आहे, याची चौकशी केली नाही. पुन्हा आम्ही तास-दीड तास हिंडलो आणि नंतर एका खेडेगावात हॉटेलमध्ये दुपारचे जेवण घेतले. हजारो गाडया जात-येत होत्या. वार रविवार होता. सूर्यनारायण प्रकाशत होता, बर्फ पडण्याचे थांबले होते, आणि त्यामुळे जवळ जवळ ५० हजार मोटारी आज ह्या भागात श्वासोच्छ्वास करीत होत्या अशी माहिती हेसने दिली. ३ माणसांमागे एक गाडी हे जर्मनीत प्रमाण असल्याने मला त्यात अतिशयोक्ती वाटली नाही. एके ठिकाणी आम्ही गाडी थांबवून बर्फातून चाललो. काठ्या घेतल्या नव्हत्या त्यामुळे पडण्याची भीती होती, म्हणून मनाचा संदेश ' धीरे गाडी हाक रे ' हा डोळ्यापुढे होता. आणि त्यातूनही पडलो असतो तर बव्हेरिया हाताला लागला अशी ऐतिहासिक घोषणा केली असती ! पण इतिहासाला ही घटना मंजूर नव्हती. कमलिनीचे उंच टाचेचे बूट लटपटत होते. ' मार्गे पदानि खलु ते विषयीभवन्ति ' अशी तिची स्थिती होती आणि म्हणून तिला हात देऊन सावरले. हेस नाचत होता. आणि वर्फाचे गोळे हातात घेऊन घेऊन दूर दूर फेकत होता. त्याची कंदूकक्रीडा नयनमनोहर होती. जवळपासही अनेक स्त्री-पुरुष ह्याच क्रीडेमध्ये रममाण झालेले दिसत होते.

येथे बर्फाला किंमत नव्हती. पुण्याच्या कोल्ड्रिंक हाऊसमध्ये उन्हाळ्यात बर्फाची किंमत पाहूनच गिऱ्हाईक सर्द होते. जेथे पिकते तेथे विकत नाही. सर्वत्र पृथ्वीचे स्वरूप शुभ्र व रुपेरी झाले होते. क्षणभर असे वाटले की, ही आदिमाता आता वृद्ध झाली आहे. पण ज्ञानाने सांगितले की, ही चिरप्रसवा आहे. सनातन, सृजनक्षम, क्षमाशील अशी ही भूमी, आणि तिला आम्ही सतत तुडवीतच असतो. भोवतालचे वातावरण तात्त्विक विचाराला सुसंबद्ध नव्हते. मोटारी रस्त्याच्या बाजूला ठेवून असंख्य स्त्रीपुरुष सूर्यनारायणाच्या देखत मनमुराद आनंद लुटत होते. युरोपमध्ये सूर्यप्रकाश आणि विशेषतः नोव्हेंबरमध्ये म्हणजे तो सणच मानतात. ४ वाजता पुन्हा एकदा परतताना दुसऱ्या एका खेडेगावातील उपहारगृहामध्ये चहा व त्याबरोबर केक वगैरे फस्त केले. भोंवताली शेतीची कामे चालली होती व ती सर्व यंत्राने चालली होती. रविवारचा दिवस असल्याने खेडेगावातील चर्चेस् त्याही संध्याकाळी भरलेली

दिसत होती. धर्म हा सर्व कालासाठी असतो. अगदी नीटनेटका पोषाख करून मुले व म्हातारी माणसे चर्चमध्ये जात होती व येत होती. बहुतेक ठिकाणी फुले व फुलांचे गुच्छ विकावयास ठेवले होते. किंबहुना म्युनिचमध्ये असली दुकाने मी कितीतरी पाहिली. संध्याकाळी परत आलो. आणि जेवण घेतल्यानंतर सुमारे २ तास पथिकचे लिखाण केले. डोळ्यांपुढे स्वप्नात बर्फच बर्फ दिसत होते. आणि मी नाचत आहे, असे वाटत होते. त्या स्वप्नांत पायाने हालचाल केली व धाडकन् पलंगाच्या लाकडावर ते आदळले व स्वप्नांत सत्याचा साक्षात्कार झाला! मग थोडा वेळ विचार करीत पडलो. सकाळी बरोबर ६ वाजता घंटा झाली. जर्मनीत अनुभव असा की, हॉटेलात राहणाराला सकाळी केव्हा उठवावयाचे व काय पाहिजे हे विचारून घेतात. मी '६ ला उठवा' म्हणून सांगे आणि त्या १२ दिवसांच्या मुक्कामात ५ सेकंद आधी अगर ५ सेकंद उशिरा अशी कधीही घंटा झाली नाही! आम्हा पुणेरी रावबाजींना इतका नियमितपणा जड वाटतो. धुंधुरमासाला बोलावले म्हणजे सत्यनारायणाच्या संध्याकाळच्या वेळेपर्यंत आम्ही पोचतो. लग्नाचा मुहूर्त सुद्धा बुडलेली घटका पुन्हां वर करून साधून घेतो. हॉटेलच्या खोलीत जवळच्या टेबलावर ३ बटणे असत. ती कशासाठी हे दाखविणारी चित्रे असत. एक चित्र हातात ट्रे घेतलेले, एक चित्र हातात झाडू घेतलेल्या बाईचे व एक हातात कागद-पेन्सिल घेतलेले. ह्या ३ चित्रांत यात्रेकरूंच्या गरजा विभागल्या होत्या. पहिले दिवशी थोडा घोटाळा झाला. चहा हवा असता झाडूवालीच्या चित्राजवळील बटण दाबले गेले व एक धटिंगण तरुणी आल्यावर तिलाच चहा पाहिजे असे इंग्रजीत सांगितले. तिला इंग्रजी येत होते म्हणून बरे, नाहीतर भलताच प्रसंग ओढवला असता. तशी चूक पुन्हा मात्र होऊ दिली नाही. ता. २ ला सकाळी बरोबर ८ ला आम्ही निघालो. आमचा मार्गदर्शक हेस हा आमच्या आधीच पोचला होता. त्याने मग आम्हांला गटे इन्स्टिटयूटमध्ये नेले. तेथे आम्ही तासभर घालविला. कॉफीपान केले. विविध विषयांवर चर्चा केली. म्युनिचच्या इतिहासाबद्दलची बरीच माहिती घेतली. राज्यव्यवस्थेसंबंधीही काही बोललो. त्या संस्थेचे डायरेक्टर डॉ. हॉटर एक मोठे विद्वान व व्यापक बुद्धीचे होते. तेथील ग्रंथसंग्रह पाहिला. नंतर पुन्हा एकदा तेथील प्रसिद्ध म्युझियम पाहिला. तेथील उत्कृष्ट उत्कृष्ट चित्रे पाहिली, रेंबॉल्ट वगैरे प्रसिद्ध कलावंतांच्या कृती

पाहिल्या. सहयात्री कमलिनीला बाजारात काही वस्तू घ्यावयाच्या होत्या. आणि आम्ही तिथे निरनिराळ्या जनरल स्टोअर्समधून हिंडत होतो. तिने पायमोज्यापासून इअररिंग्जपर्यंत सर्व गोष्टी पाहिल्या. नखाच्या रंगापासून केसाच्या तेलापर्यंत सर्व वस्तूंची चौकशी केली आणि बरीच खरेदी पण केली. जनरल स्टोअर्समध्ये मटारापासून मटनपर्यंत सर्व पदार्थ विक्रीसाठी होते. माणसाला जेवढे काही लागते, तेवढे तेथे विक्रीस होते. विक्रीस नव्हते मनुष्य अगर अन्य प्राणी. एकेका वेळी १००० गिऱ्हाईक तेथे असते असे कळले. गडबड नाही, गोंधळ नाही, भाव करणे माहीतच नाही. पदार्थांच्या किंमती पदार्थावर अगर कौंटरवर लिहिलेल्या. पदार्थ निवडावयाचा, लागलीच पावती मिळते. बेरीज-गुणाकार यंत्रे करतात. मोठ्या दरवाज्याजवळ तुम्ही पोचेपर्यंत तुम्ही खरेदी केलेले सामान पद्धतशीरपणे बांधलेले–जणू लग्नाचा आहेर केला आहे–सुहास्यवदनाने तेथील कर्मचारिणी तुम्हांला देते; व मग पैसे दिले की, ते सामान तेथे असलेला पुरुष नोकर तुमची गाडी असल्यास गाडीत टाकतो अगर ते बंडल तुमच्या हवाली करतो. कित्येक स्त्रिया बाबागाडी घेऊन येतात, व त्यांत बेबीऐवजी हें बंडल ठेवतात! सर्व सामान आम्ही मोटारीत टाकले. माझे काहीच सामान नव्हते. तेथील वस्तूंची मांडणी, विभागांची मांडणी, गिऱ्हाईकाबद्दल आपुलकी व दक्षता, लगबग असून सुद्धा शांतता, 'देरे वाण्या आणि घेरे प्राण्या' असे स्वरूप असूनसुद्धा ठकबाजी, लबाडी, खोटे माप, खोटा भाव तेथे नव्हता. ह्या साऱ्या अनुभवांचाच बोजा–माल मी माझ्याजवळ घेतला. पाण्यातील पाषाण वर काढल्याबरोबर जसा कोरडा असतो तसा मी त्या साऱ्या मीनाबाजारांतून, लक्ष्मीबाजारातून, कुबेराच्या नगरीतून अक्षरशः रिक्त हस्ताने व रिक्त खिसा न होता बाहेर पडलो होतो! मला वाटते की, हा मी एक विक्रम केला. फक्त एवढेच सांगतो की, खिशात जर्मन चलन नव्हते म्हणूनच हा झाला. अन्यथा ते अशक्य झाले असते.

## आगळे सौजन्य

१२ वाजता आम्हांला कोनिंगहाफ ह्या प्रसिद्ध उपहारगृहात बव्हेरियाचा मंत्री हेर जोन्स मोरेर हा जेवण देणार होता. येथील पद्धतीप्रमाणे सगळे सत्कार, सगळी संमेलने, सगळे आदरातिथ्य वगैरे हॉटेल्समधून होतात. बरोबर १२ वाजता

आम्ही ह्या उपहारगृहांत प्रवेश करते झालो. यजमानाची बायको आधीच आली होती व पतिराजाला फक्त ३ मिनिटे उशीर होईल, म्हणून राग मानू नये, असे तिने सांगितले. एवढ्याशा विलंबासाठी एवढे सौजन्य प्रथमच आयुष्यात दिसून आले. आमचेकडे विलंब हा नियम व नियमितपणा हा अपवाद!

मंत्री असताना एका संमेलनाला मुख्य पाहुणा म्हणून गेलो व बरोबर वेळेला गेलो. तेथे फक्त एक पहारेकरी ह्या पलीकडे कोणी नव्हते. साधारण २ तासांनंतर समारंभाला सुरुवात केली व मी मग ५ मिनिटांत सर्व समारंभ संपवून घेतला! माझी कार्यक्षमता माझ्या यजमानाला पटली की नाही हे माहीत नाही. पण मला पटली. मोरेर हे बव्हेरिया ह्या घटकराज्याचे मजूर आणि समाजकल्याण खात्याचे मंत्री होते. त्यांच्याशी १ तासभर जेवता जेवता नानाविध प्रश्नांवर चर्चा झाली. पुनर्वसनाचा प्रश्न त्यांना तीव्र वाटत होता. त्याचा थोडासा अनुभव मंत्रिपदी असताना मला होता. आणि निर्वासितांची प्रतिक्रिया परिस्थितीला अनुरूप, कधी प्रतिकूल, कधी विकृत कशी असते, ह्याचे अनुभव आम्ही तुलनेने चर्चिले. त्यानंतर आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा झाली. समाजकल्याण खात्याबद्दल थोडी माहिती घेतली. शिक्षणखाते अगर शिक्षण-मंत्री असे काही बव्हेरियात अगर जर्मनीत नाही. ते सर्व काम समाजकल्याण ह्या खात्यामार्फत होते. शिक्षणपद्धतीवर पुढे लिहिणार आहे.

त्याच जेवणाचे वेळी कु. ब्रिगेटे – मध्यमवयाची शिक्षिका शोभेल अशा हावभावाची – हजर होती. तिचे व कमलिनीचे चांगलेच मेतकूट जमले. दोन पुरुष एकत्र आले म्हणजे बहुशः टक्कर घेणाऱ्या एडक्यांप्रमाणे बघत असतात. पुढे त्यातून सद्भावही निर्माण होतो, प्रसंगी अन्य काही होते. पण दोन स्त्रिया एकत्र आल्या म्हणजे श्रीखंडी मिठी मारतात – म्हणजे गाढ व गोड. ह्या दोन मध्यमवयीन स्त्रियांनी तासभर विविध शिक्षणक्षेत्रातील विषयांची चर्चा केली. किंबहुना साऱ्या तेरा दिवसांच्या जर्मनीच्या दौऱ्यात कमलिनी शिक्षणाशिवाय अन्य विषय चर्चीत नसे. व जो काही थोडा वेळ मिळे त्यात बाजारात त्या त्या स्थानाच्या प्रसिद्ध गोष्टी घेण्यात घालवी, तासभर चर्चा झाली. आम्ही पाच जण एका प्रशस्त खोलीत जेवत होतो. प्रत्येक गोष्ट यंत्राप्रमाणे येत होती. आम्हा दोघांशिवाय बाकीच्या भोजकांनी पाण्याशिवाय सर्व काही पिण्याचे ठरविलेले होते. आम्हांला पाणी हवे होते आणि ते जे मिळाले ते सोड्याप्रमाणे

लागत होते. त्याला खनिज पाणी असे म्हणत ( मिनरल वॉटर ). माझा आत्माराम त्याने शांत झाला नाही. मग मी ताज्या द्राक्षाचा रस एक ग्लास प्राशन केल्यानंतर आमची ही विद्वज्जन सभा संपली. दुपारी ३-२७ च्या गाडीने हायडेलबर्गला जायचे होते. जेवणानंतर मिळालेल्या एक तासात कमलिनी पुन्हा जनरल स्टोअर्समध्ये जाऊन आली. काय घेऊन आली हे मी विचारले नाही. ती तिलोत्तमा नं. २ होती हे खरे. पण मी तिला विचारणे बरे नव्हते, आणि ते सौजन्य माझ्यामध्ये जन्मापासून आहे.

३–१५ ला आम्ही स्टेशनवर गेलो. हमाली ज्याची त्याने करावयाची असते. ज्याने त्याने आपला सूळ ( cross ) खांद्यावर घेऊन जावे, ह्या बायबलच्या उपदेशाची आठवण झाली. कमीत कमी सामान म्हटले तरी एक मोठी बॅग, एक ब्रीफ केस छोटी, लुफ्ताना कंपनीने दिलेली एक जाहिरात करणारी बॅग, चौथी छत्री पण चेंबरलेनची नव्हे, आणि अजस्र ओव्हरकोट. साऱ्याचे वजन म्हटले तर मणाचे खाली होते; पण खांद्यावर ७० वर्षांचे ओझे असल्याने सर्व ओझे नेणे कठीण होते. शिवाय मनाचा निश्चय केला असता तर तेही नेले असते. पण मनाचे गाढव, तीन दिवसांच्या मुक्कामात म्युनिचला जे पाहिले होते, त्याने वाकले होते. तात्पर्य, हेस जेव्हा सामान घेतो म्हणाला, तेव्हा पेशवाई हास्य करून 'कशाला कशाला?' असा देखावा केला. कमलिनीने आपले सामान उचलले. गुजराथेमध्ये स्त्रीने बोजा उचलणे हे आर्यस्त्रीचा धर्म मानतात!

आम्हांला ज्या गाडीमध्ये जागा राखून ठेवण्यात आली होती, तेथे नेण्यात आले. सामानाची काळजी असल्याने चटोरपणा करत प्लॅटफॉर्मवर हिंडू शकलो नाही. इकडे तिकडे पाहावे असे वाटत होते; पण जर्मन लोकांची वक्तशीरपणाची दुर्दैवी सवय मला सर्वत्र नडली. आणि म्हणून बऱ्याच मुलींचा घोळका दूरवर असलेला जवळून जाऊन पाहू शकलो नाही. आमचा प्रवास ३ तासांचा होता. आणि हेसने कंडक्टरला सांगून ठेवले की, हायडेलबर्ग स्टेशनवर आमची व्यवस्था कर व वाटाड्याचे हवाली आम्हांला कर. म्युनिच सोडले. त्या इतिहासप्रसिद्ध शहराची कीर्ती ऐकली होती. तेथील राजेरजवाड्यांच्या रंगेल व रंगेल गोष्टी ऐकल्या होत्या. कैसरकालीन त्या शहराचे महत्त्व ऐकले होते. हिटलरशाहीत ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही, त्या साम्राज्याच्या मुख्य प्रधानाला येथेच हिटलरने हीन, दीन केलेले वाचले होते. १९३८ साली

चेंबरलेनची छत्री जगप्रसिद्ध झाली. व त्याने केलेला म्युनिचचा करार दुसऱ्या महायुद्धाची नांदी ठरली. म्युनिचमध्ये पिक्चर गॅलरी, म्यूझियम व कायाकल्प केलेले सारे शहर ह्या सर्वांच्या स्मृती मनामध्ये गर्दी करीत होत्या व अशा स्थितीत आम्ही म्यूनिच सोडले.

गाडीमध्ये दोनच तऱ्हेचे वर्ग होते. एक फर्स्ट क्लास व दुसरा सेकंड क्लास. पण दोहोंत फरक काहीच नव्हता. हिंदी रेल्वेतील वर्ग अगर जातिव्यवस्था तेथे नव्हती. सामान आम्हा दोघांजवळ जे होते तेच होते. इतर प्रवाशांचे जवळ एखाद्या छोट्या बॅगशिवाय काही दिसले नाही. मधल्या कोठल्याही स्टेशनावर 'चिकी, चिकी... बटाटा वडा' असे कर्णकठोर शब्द ऐकू आले नाहीत. किंबहुना ज्याला कोणाला काही हवे असेल त्याने रेस्टॉरंटकारमध्ये जावे व घ्यावे. बरोबर ४ चे सुमारास दुपारचा चहा तयार आहे असे एक नोकर सांगून गेला. नंतर मी तेथे चहा घेतला आणि एका कपाचे बिल २। मार्क्स म्हणजे २॥ रु. झाले. अर्थात् ते मी कफल्लक असल्याने-म्हणजे जर्मन चलनाचे बाबतीत कफल्लक असल्याने – कमलिनीने दिले. आम्ही औद्योगिक वातावरणाने सज्ज झालेल्या जर्मन प्रदेशातून जात होतो. नदीच्या समांतर असा रेल्वेमार्ग होता. मैलच्या मैल नदीच्या दोन्ही बाजूंस कारखानेच कारखाने दिसत होते, आणि डोंगरावर फळांची व धान्यांची लागवड होत होती. मधून मधून काही किल्लेवजा वस्तू दिसत होत्या. आता त्याचे महत्त्व राहिले नव्हते. आता युद्धशास्त्र बदलले होते. पूर्वी एक गड म्हणजे आसमंतातील ५० मैलांचा चौरस प्रदेश ताब्यात ठेवता येत असे. गडकरी, मेटकरी ह्यांना भाव होता.

महाराष्ट्राच्या इतिहासातही असाच प्रकार आढळून येतो. किल्ला वर्ष वर्ष महाराष्ट्रात लढविला जाई. अफजुलखानाच्या स्वारीच्या आधी शिवाजीने बादशहाला पत्र लिहिले होते व त्यात सांगितले होते की, '३०० किल्ल्यांचा मी मालक आहे. एक एक किल्ला वर्षभर लढवीन आणि तुम्हांला खुदाने ३०० वर्षांचे आयुष्य दिले नाही, तेव्हा सद्धर्माने वागा.' आता डोंगरी किल्ल्याचा हवेतून बॉंब टाकून फडशा करता येतो. आता सारे युद्धतंत्र बदलले आहे. आणि जर्मनीने त्या बाबतीत गेल्या महायुद्धात अत्यंत प्रगती केली होती. ज्या चतुर डोक्याने, कलासंपन्न हाताने व कसबी मनगटाने विध्वंसक कार्यें केली ती सर्व आता विधायक कार्यक्रमात गढलेली दिसली.